*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

**संपादक**
**रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

**कार्यकारी संपादक**
**ग. शां. पंडित**

**वर्ष : ३२ वे** **ऑक्टोबर-डिसेंबर २०११** **अंक : चौथा**

# अनुक्रमणिका

संपादकीय ---------------------------------------------- २

१) ९ वे अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन, नागपूर २०११
मा. उषाकिरण आत्राम, संमेलनाध्यक्षा, भाषण ----------------------- ३

२) महाराष्ट्रातील आदिवासी लोकसाहित्याचे संशोधन : स्वरूप व दिशा
प्राचार्य डॉ. मोतीराम देशमुख ---------------------------------- २३

३) दलित साहित्य चळवळ आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोन : रिना कांबळे ---------- ३१

४) आदिवासी युगुलांचा प्रिय भोगऱ्या बाजार : अजय पालीवाल --------------- ३५

५) वाघोडे आदिवासीवाडीवरील एक सकाळ : नवीन सोष्टे ------------------ ३७

६) शिक्षकांची सामाजिक बांधिलकी : महेंद्रकुमार आ. जाधव ---------------- ४१

७) 'गोंड संस्कृती चे जतन'हेच शाश्वत पर्यावरण संवर्धन २०१२ चे संकल्प
प्रा. कुंदन साबाशीव दुफार ------------------------------------ ४५

८) वैदूंमार्फत चाललेली आदिवासींची आरोग्य व्यवस्था -------------------- ४७

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
२०१, आकांक्षा रेसिडेन्सी,
औंध, पुणे - ४११ ००७.
टेलिफोन (०२०)२५८९७२९८

**अंक मूल्य ४०/- रूपये**

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे

◆ **इतर छायाचित्रे**
वारली कला


◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुखपृष्ठ छायाचित्र**
'आदिवासी उत्थान कार्यक्रम'
छायाचित्र संग्रहातून साभार

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

या अंकाच्या प्रकाशनासाठी **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांचेकडून अनुदान मिळाले आहे.



# ‘आदिवासी लोकसाहित्याचे स्वरूप व दिशा’

## संपादकीय

३२ व्या वर्षातला हा अखेरचा अंक आदिवासी लोक-साहित्या विषयी चर्चा करणारा आहे. याचे आपण स्वागत कराल ही अपेक्षा आहे.

आदिवासी समाजातील ज्येष्ठ कवयित्री-लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती उषाकिरण आत्राम यांची ७ व ८ मे २०११ मध्ये नागपूर येथे संपन्न झालेल्या ९ व्या अखिल भारतीय आदिवासी संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून निवड झाली होती. त्यांनी संमेलनाध्यक्षा या नात्याने जे विचार मांडले ते या अंकात प्रसिध्द केले आहेत. उषाकिरण आत्राम या अत्यंत मनमिळावू स्वभावाच्या, हसमुख व अभ्यासू कवयित्री व लेखिका. त्यांचे काव्य वास्तवाशी नाळ जोडणारे; परंतु कोणालाही न दुखवता हळुवारपणे आपल्या समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे. त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांचे विचारही अत्यंत प्रगल्भ आहेत. आदिवासी साहित्य हे लिखित कमी मौखिक जास्त. आपल्या विचारांच्या मांडणीत हे त्यांनी सांगितलेले आहेच. याशिवाय आतापर्यंत ज्यांनी आदिवासी जीवन व साहित्य यावर पीएच.डी. केलेल्या आहेत, त्यावरूनही दिसून येते की, त्यात लोकसाहित्याचा भाग अधिक आहे. डॉ. मोतीराम देशमुख यांनी आपल्या लेखातून आदिवासी लोक साहित्यावर संशोधन करणाऱ्यांना एक उत्तम मार्गदर्शन केलेले आहे.

रिना कांबळे यांचा दलित साहित्य चळवळीवरील लेखही विचार प्रवर्तक आहे. याशिवाय आदिवासी समाजातील काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींची माहिती इतर लेखांमधून आपल्याला मिळते.

वाचक या अंकाविषयीचे अभिप्राय कळवतीलच.

**कार्यकारी संपादक**

# ९ वे अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन, नागपूर २०११
## संमेलनाध्यक्षा मा. उषाकिरण आत्राम यांचे भाषण

बंधु भगिनींनो,

सगा साथीओ,

सर्वांना मनापासून जयसेवा ! जय जोहार !

९ वे अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलन भारताच्या हृदयकेंद्रस्थानी असलेल्या नागवंशियांच्या महानगरात संपन्न होत आहे. या महानगराला ज्या गोंड राजाने वसविले त्याचे नाव होते बख्तबुलंदशहा उईके. महानगरात किल्लामहल, तालाब, हाटगुजरी क्रीडांगणे, बागबगीचे, बाजारहाट, सुसज्ज सुरक्षा, सौंदर्य आणि नियोजनबद्ध आखणी करुन राजनगरीची उभारणी केली व इतिहास घडविला. नागनदीच्या काठावर शेकडो वर्षापासून राहणाऱ्या नागवंशियांचे सत्ताकेंद्र म्हणून नागपूर हे सार्थ व अर्थपूर्ण नाव दिले. या पवित्र नागभूमीत सौंदर्यशाली महानगरात देशभरातून आलेल्या बुध्दिवंत, ज्ञानवंत, कलावंत, प्रज्ञावंत, विचारवंत, साहित्यिक, लेखक, कवी, जनप्रतिनिधी, पत्रकार या सर्वांचे मी मूळनिवासी यांच्या नागनगरीत, माहेरघरात, या मंडपात, खुल्या मनाने हार्दिक स्वागत करते ! अभिनंदन करते ! आपण आनंदी मनाने विराजमान व्हावे - ही प्रार्थना !



आदिवासींचे प्रेरणास्थान व आधारवड स्वागताध्यक्ष मा. आदरणीय मधुकररावजी पिचड, कार्यक्रमाचे उद्घाटक, प्रमुख अतिथी, आयोजक समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, देशभरातून आलेले आदिवासी विकास परिषदेचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते, धुरा सांभाळणारा धडपड्या दशरथ मडावी, प्रा. डॉ. माहेश्वरी गावित, ॲड मनिरामजी मडावी. तरुण रक्ताचा बिनधास्त विचाराचा कृष्णकुमार, गणेश परतेकी, आर. यु. केराम, माझे बंधू पुंडलिक आत्राम व समाजसेविका पुष्पाताई आत्राम व माझ्या सर्व रसिक बंधूनो, भगिनींनो सर्वांना मानाचा मुजरा !

आपण सर्वांनी साहित्य संमेलनाचे बहुमानाचे अध्यक्षपद माझ्यासारख्या सामान्य महिलेला दिले व जो विश्वास दाखविला त्याबद्दल तहे दिलसे अभिनंदन करती हूँ ! मी तर कोणी मोठी साहित्यिक लेखक कवी नाही, परंतु दिलेली जबाबदारी आतल्या अं:तस्थ वेदनांची भरलेली ओटी - त्या जखमांवर कोरलेल्या लेण्या पाहताना वाचताना मन भळभळून जाते, तो अंतस्थ: हुंदका मोकळा करुन आपल्याशी हितगुज करते !

विचारमंचावर विराजमान विद्वान प्रज्ञावंतांनो, या नागभूमीत मांडलेल्या साहित्य संमेलनाच्या जागरात आपण सहभागी झालात. डॉ. बाबासाहेबांनी याच नागभूमीवर लाखोंना बंधमुक्त केले अशी परिवर्तनाचा वसा असलेली पावनभूमी आणि या भूमीवर जे जे महान शौर्यशाली धुरंधर झालेत त्या सर्वांना, कै. बाबुरावजी मडावी, माजी राज्यमंत्री ह्यांना माझे अभिवादन !

या नागभूमीच्या मातीमध्ये नवीन नागवेल लावण्यासाठी देशभरातून आलेल्या माझ्या भावंडांनो, निळ्या आभाळाच्या मांडवावर साहित्याची वेल बहरुन देशोदेशीच्या आदिवासी दलित माणसापर्यंत तिचा आत्मसुगंध पोहोचविण्यासाठी, नवा बहर अनुभवण्यासाठी शांतीसोबतच, मानवी उत्थानासाठी दडपून गाडून टाकलेला इतिहास, स्मृतिगंध खोदून काढण्यासाठी, विचारमंथन करण्यासाठी आदिवासींचे गतवैभव, इतिहास, साहित्य, संस्कृती, भाषा, लिपी, धर्म, परंपरा, नीतीमूल्ये, स्वत्व, अस्तित्व, अस्मिता, अभिरूची या साऱ्या... मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी आपण आलात. आदिवासी संस्कृती इतिहास, हा एक समृध्द खजिनाच आहे. आदिवासींचे मौखिक साहित्य जणू नवरत्नांचे भांडार आहे. लखलखते सोनेरी पान आहे. महान संस्कृती व उच्च कोटीचे तत्त्वज्ञान, पूर्वजांच्या शौर्यगाथा, क्रांतियुध्दे, वीरयोध्दे, महानगरे, किल्ले सुरंग, तटबंद्या, धनसंपन्न कोठारे, अतिउत्कृष्ट शिल्पकला, बांधकाम, समृध्द भाषा, सुसंस्कृत श्रीमंत संस्कृती, अनेक बोलीभाषा, त्यांचे व्याकरण, शब्दकोष, त्यांचे लोकसाहित्य, त्यांचे वाद्यनृत्य, संगीत, त्यांचे निसर्गाशी घनिष्ठ नाते, त्यांचा समूहसहकार्य उदात्त समाजवाद, त्यांची देवदैवते हे सारेच न उलगडणारे कोडे आहे. या सर्व बाबीवर आपणास दोन दिवसात होणाऱ्या कविसंमेलन, कथाकथन, चर्चासत्रे, परिसंवादामध्ये भरपूर मेजवानी मिळेल. आपण आनंदी मनाने आस्वाद घ्यावा एवढीच प्रार्थना !

आदिवासी साहित्य ख-या अर्थाने सर्व साहित्याचे मूळ आहे. ते अलिखित आहे. परंतु समाजमान्य आहे. ज्याप्रमाणे इंग्लंडचे संविधान अलिखित आहे; परंतु सा-या दुनियेत त्या संविधानास मान्यता आहे, त्याचप्रमाणे आदिवासी साहित्य अलिखित असेल तरी ते समाजमान्य आहे. त्याचे मूल्य अमोल आहे. ते शाश्वत व चिरंजीवी आहे.त्याचे रूपसौंदर्य बेजोड आहे. ते परिपूर्ण अस्खलित आणि नितांत सुंदर आहे. उच्चकोटीचे अमर्याद ज्ञानभंडार आहे. मनुष्याच्या जीवनव्यवहारासोबतच सख्य असलेले, निर्मळ मनाच्या गाभा-यातून अंतस्थ भावभावनांच्या अंतरंगीचे तरल सुंदर शब्दफुल आहे. त्यात नाही खोटेपणा, नाही कपट, नाही चोरी, नाही शेरजोरी, नाही मुजोरी, नाही नक्कल,नाही हेराफेरी, स्वच्छ मनाच्या भावसुरातून अंतरंगाच्या सुरेख बासरीतून निघालेले सप्तसूरच आहे. वाणीतून निघणारे

सौंदर्यपूर्ण भावगर्भ उच्चकोटीच्या प्रतिभा घेवून निघालेली रसाळवाणी जणू रानमोगरा-रानजाई-रानचाफयाचा सुगंधसडाच, अंतःनभीची खळखळ, वा-याची मंदमंद बासुरी, फुलांचे हसणे, काळया आईच्या कुशीत हळुवार टपटपणे, रानपाखरांची हिरवळीतून आलेली गोड शिळ, सहज ओठावर आलेले साक्षात चैतन्य शब्दसूर, फुलांची ओंजळ म्हणजे आदिवासींचे मौखिक साहित्य, ना थांबनारे ना संपणारे ना थकणारे. सतत एका पिढीतून दुस-या पिढीकडे सोपविलेला जणू अलिखित पूर्वजांचा खजानाच ! लिखित नाही म्हणून ते साहित्य नाही काय? इतिहास, कथागाणी, गोष्टी, शौर्यगाथा, लोकगाणी, लोकवाणी, लोककथा कहाण्या, वाक्प्रचार, म्हणी, चुटकुले, झुलवे, खेळगाणी, प्रेमगाणी, निसर्गगाणी शिकारगीते, विवाहगीते, सणाची गाणी, प्राणी पक्ष्यांची गाणी, धरतीपाऊस वा-या-ता-याची गाणी, प्रचंड शब्द भांडार, सुंदर व्याकरण, मंत्रतंत्र, देवगाणी या सा-यांचा रसिकतेने आस्वाद घेतल्यास सारी साहित्यशास्त्रे, सौंदर्यशास्त्रे थिटे पडतील, फिके पडतील, एवढा न्यारा थाट, एवढा उंच घाट आहे, माझ्या मौखिक साहित्याचा ! आदिवासींचे जगणे आणि व्यवहार हाच एक महाकोष आहे. त्यांची संस्कृती, रीती परंपरा, जगणे, वागणे हाच एक महान ग्रंथ आहे. जीवनपद्धतीची सांस्कृतिक मूल्ये आहेत. आदिवासी समाजांनी ज्या जीवनमूल्यांनाच कायदा कानून नियम व जीवन पद्धती बनवून जीवनव्यवहार केला. त्याला जगण्याची योग्य दिशा, जगण्याचे आत्मबळ, जगण्याची खरी किमया समजून, सामाजिक स्वरूप दिले. जीवनावश्यक नियम बनविले.

बंधुभगिनींनो ! मला साहित्याची आवड लहानपणापासूनच होती. पण साहित्य म्हणजे काय? मुळीच कळायला मार्ग नव्हता. कारण माझे बाबा आदरणीय दादाजी आत्राम (मोकाशी) चांदगड आत्राम घराण्यातील, परंतु राजपाठ, सत्ता जमीनजुमला सारे गेल्याने एक सामान्य शेतकरी. तीन वर्ग शिकलेले; पण स्वाभिमानी स्पष्ट बोलणारा उदार, प्रेमळ, हुशार माणूस ! त्यांना संगीत नाटक कलेची गाण्याची फारच आवड. ते वीणा वाजवून गायचे, भजने म्हणायचे. त्यांना सुरताल स्वरांची चांगलीच जाण होती. ते जेव्हा गाणी म्हणायचे तेव्हा एकेका शब्दाचे रूप सौंदर्य, भाव मला मोहात पाडायचे. मनातल्या मनात मी शब्द जुळवून गाणे म्हणायची. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीला आईवडील झुंज देत होते, त्याचे चटके आम्हालाही बसायचे. पण शिका - मोठे व्हा ! चांगले व्हा ! हे वाक्य आमच्या पाठीशी ! शारीरिक आजारापायी वरचेवर माझेवर शस्त्रक्रिया होवून मी मृत्यूवर मात केली. त्यामुळे स्वाभाविकपणे मी भावनाप्रधान बनले. संघर्ष करून शिकताना मी चंद्रपूरला आहे. कॉलेज जीवनात मला प्रसिद्ध व्यंगचित्रकार मनोहर सप्रे व प्रसिद्ध साहित्यिक सुरेश द्वादशीवार सारखे गुरू मिळाले. शिक्षणासोबत साहित्य, इतिहास, तत्वज्ञान व फुले आंबेडकर विचार कळले. मी वाचू लागले आणि एकेक अंधाराचा ढग माझ्यापासून दूर दूर पाळाला. फुले आंबेडकरांच्या विचारांचे सोनेरी किरण माझ्या मन मस्तिष्कापर्यंत पोचले आणि ''झाले मोकळे आकाश.....'' माझी प्रेरणा माझे विचार माझी दिशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सवित्रीबाई फुले झाले.

मित्रांनो ! लहान वयातल्या देवदैवतांच्या

कल्पना आपोआप गळून पडल्या. १९७७ मध्ये मला एटापल्ली येथे नोकरी मिळाली . मनात खूप शिकण्याची इच्छा असताना व मी हुशार असतानाही परिस्थितीमुळे मन मारून नोकरी करावी लागली. त्यावेळची एटापल्ली, जंगलरान, माझी माणसं, माझे लोक, त्या झोपडया, ती भूक, त्या वेदना, ते बेहाल, ते कुपोषण, ते शोषण, अत्याचार पाहून मी अस्वस्थ झाले. गोंडी / तेलगू भाषा जवळून न्याहाळाता आली. त्या वास्तव जगण्यातले दाह दारिद्रय पाहून पहिली 'आई' कविता मी साप्ताहिक प्रतिज्ञा 'चंद्रपूरला पाठविली'. ती प्रकाशित झाली. तिथून माझ्या कवितेचा डोंगरद-या, आडवाटा, काटेगोटे, सारे पार करीत प्रवास सुरू झाला. नि फुलांचे हार गोजरे न करता माझी लेखणी पळसांची लाल आग होवून शब्दफुले, दाहक अंगाराचा शृंगार करू लागली. सा. नागसेनेचे संपादक यांचे आभार मानते, त्या माझ्या भावांनी माझ्या खूप कविता त्यावेळी मराठी हिन्दीमधून प्रकाशित केल्या . पुन्हा मी मागे फिरून पाहिलेच नाही. डोळयांपुढील वास्तव वेदना, शोषण, अत्याचार, समाजातील हे जगणं वागणं त्या वेदना माझ्या कविता-कथा झाल्यात. मी माझ्या लेखणीची तलवार बनले साहित्यक्षेत्राच्या जवळ पोचले. आदिवासी-दलित साहित्य आंबेडकरी साहित्याशी नाळ जुळली. डॉ. विनायक तुमरामांनी आदिवासी साहित्याची स्वतंत्र मुहूर्तमेढ रोवली. आदिवासी साहित्यिक सारी भावंडे आम्ही जुळलो. राजाभाऊ राजगडकर, ऋषी मेश्राम, भुजंग मसराम, मारोती कुळमेथे, वाहरू, प्रभू मी स्वत: त्यांत व्यंकटेश आत्राम, पुष्पाताई आत्राम एकेक करताकरता एकाचे एक्कावन होवून पहिला थवा जोमाने निळया आभाळात साहित्याचं जाळ घेवून उडाला, पंखात साहित्याचे जग घेण्यासाठी एक जबरदस्त जोरकस गोताळगुच्च्या तयार झाला. साहित्याचं जग फार मोठे मोठे ज्ञानी पंडीत..... अबब ! मी तर हरखूनच गेले. पण ह्दयातला आकांत जाळ कसा थांबणार. लेखणीला धार आली आणि एकेक अंधाराचे जाळे कापणे सुरू केले. गडयांनो ! आमच्या वाट्यालाच का हे दु:ख? का हे शोषण ? का हे हाल? का हा अन्याय? का ? त्यानेच मला डोळे दिले. अंधार दु:ख दैन्य दारिद्रय आकांत पाहण्याचे !.... आणि शोधू लागेल तेव्हा कळलं, अरे ! आपण तर महान संस्कृतीचे, या भूमीचे वारसदार आहोत.

मित्रांनो, आदिवासी समाजात मातृशक्तीला मोठे स्थान आहे. मातृशक्ती हे समाजाचे अधिष्ठान आहे. प्रचीन काळात या महान मातांना त्यांच्या अमूल्य कार्यासाठी, समाजासाठी दिलेल्या योगदानासाठी 'समाजमाता' म्हणून पूज्य मानतात. माता ही निर्माती, म्हणून ती सर्वश्रेष्ठ ! म्हणूनच धरणीमाता, समाजमाता, कुटुंबमाता, जन्ममाता, निसर्गमाता, जलमाता, श्वेतमाता, अग्नीमाता, राजमाता, या सर्व मातांची पूजा केल्या जाते.

आदिवासी समाजामध्ये जंगोमाता, कलिकंकाली, हिंग्लाजमाता, राजराणी, बमलेश्वरी, दंतेसरी, महामाया, काम्का, अम्बा, खल्लारी अंजारमोतीन, सम्लाई, येलम्मा, समक्का- सारक्का, गिरजा मोहल्ला, पंडरीपुंगार या सर्व मातांना देव मानतात. आदिवासी समाज यांची प्रार्थना करतात.

पुरातन काळावर नजर फिरविल्यास अंगावर रोमांच उभे राहतात, एवढया शूरवीरांगना झाल्यात. ताडका शूर्पणखा, मंदोदरी, तारा, मदालसा, सुलोचना, लंकनी, डंकनी सारख्या बहाद्दर विरांगना झाल्यात. परंतु या अनार्य विरांगनांना आर्यांनी मात्र राक्षसिनी,

पिशाच्च, भुतनी, लावडी, पापीनी, हिंस्त्र, अक्राळविक्राळ किळसवाण्या, बेढब, कुरूप, भयानक भीती वाटणाऱ्या चेटकिणी (ज्या माणसांना खातात) मंत्रतंत्र, जादुखोरीन, माणसं मारणा-या, रक्त पिणा-या असे भयग्रस्त चित्र आपल्या वेदपुराणात रामायण, महाभारत ग्रंथात करून ठेवले व लोककथेच्या लोकसाहित्याच्या माध्यमातूनही असेच ओंगाळवाणे चित्र व चरित्र पसरून अनार्य स्त्रियांचा अपमान केलेला आहे. नीच, दुष्ट पापीनी म्हणून त्यांना शिव्या दिलेल्या आहेत.

**भारतीय इतिहासावर एक नजर.....**

इतिहासावर नजर टाकल्यास, एकापेक्षा एक सरस बलाढय मर्दानी झालेल्या आहेत. त्यांचा लखलखाता इतिहास व शौर्यगाथा ऐकून रक्त उसळू लागते. परंतु लेखणीच्या ताबेदारांनी, चोरांनी आमच्या मायमातांचा सोनेरी इतिहास गाडून टाकला. यात राज्यकर्त्या, रणमैदानावर तलवार चालविणा-या, शत्रुंच्या मुंडया उडविणा-या शत्रूसोबत प्रत्यक्ष तडपत्या तलवारींचा खणखणाट ऐकत शत्रूला पाणी पाजणा-या, शत्रूला रणमैदान सोडून पळवून लावणा-या, राज्यसत्तेचे सिंहासन सांभाळणा-या, किती वर्णन करावे? यात उत्कलची राणी सवरा जिच्या वाणीने सम्राट अशोकाचं मन परिवर्तन होवून, हातातील तलवार फेकून, बुद्धधर्म स्वीकारला. शिल, प्रज्ञा, करूणेचा बुद्धाचा धम्म जगभर पसरविणारा सम्राट अशोकाने जिला ' धन्यमाता म्हणत दंडवत घातले' अशी बहादूदूर सवरा ! राणी पद्मावती, राणी पोहपाल, राणी कमलाराणी कमालहिरो, चक्रकुटची राणी तिलकाराणी, गढमंडलाची दुर्गावती, चंद्रपूरची राणी हिराई, बल्लारशाची राणी हिरमोतीन, विजयनगरची राणी नंगला, चित्तुरची राणी चिनम्मा, मनकी उईके, भागरथा आत्राम नंदोरी, याशिवाय संथाल परगणा, भिलवाडा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, गुजरात, ओरिसा, नागा, आसाम, मधील अनेक आदिवासी विरांगनांनी रणमैदान गाजविले. मायभूमीसाठी रक्षणासाठी आपले प्राण दिले. कारण आदिवासी संस्कृतीमध्ये स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य देवून कुटुंबप्रमुख, समाजप्रमुख व राज्यप्रमुख म्हणून सन्मानपूर्वक न्याय दिला जातो.

आजसुद्धा सर्व आदिवासी समाजामध्ये मुलगी झाली की, आनंद उत्सव मोठया जोशात साजरा करतात. मुलगी झाली ही हाक टोल्या, पाडयावर गेली की, सारे ढोल मांदीरी घेऊन अंगणात गोळा होतात, जुन्या काळात चांदीची वाटी, चांदीचे ताट वाजवून आनंद साजरा करायचे. ढोल मांदळी वाजवून गाणी म्हणायची. पहा हे लोकगीत कोण्या एकेकाळी कोणी तयार केले? पण त्यातील भावसुगंध सौंदर्य वेड लावते जीवाला ''माझ्या अंगणात सुगंधाची वेल लागली..... उद्या तिला फुलं येतील...... देशादेशीचे राजे येतील '',

दुसरं गीत......

''अंगणात लागला गोड पाण्याचा झरा,

सा-याले होईल आसरा.....

तिसरे गीत

''झाली बेटी - आली बेटी

धनाची सापडली बाबा पेटी''

बाळंत झाल्या घरी रोज एक हेल पाणी प्रत्येक घरची बाई टाकते. सांगा मला? एवढं मुलीचं स्वागत कोणत्या संस्कृतीमध्ये केले जाते? मग आमची संस्कृती मागास कशी?

बंधुनो ! विचारवंतांनो ! कवी, लेखक, समीक्षक, अभ्यासक तत्वचिंतक, हितचिंतक, समाजचिंतक हो ! या बलाढय भारताची लोकसंख्या लगबग १ अरब १० कोटी आहे. त्यात आदिवासी लोकसंख्या किती असावी ? हा शासकिय गोपनीय दस्तऐवज आहे. खरी लोकसंख्या सांगितलीच जात नाही. इंग्रजाकडून १९३१ मध्ये झालेल्या जनगणनेत साडेसात करोड सांगितली गेली. आझादीच्या ६३ वर्षानंतरही आदिवासींच्या जन्मदरात वाढ झालीच नाही का ? १९५० मध्ये संविधान लागू झाले. मात्र आदिवासी साठी क्षेत्रबंधनाची अट ठेतली होती. १९७६ मध्ये आंदोलनानंतर ती काढण्यत आली. आजसुद्धा काही राज्यांत आदिवासी असूनही आदिवासी नाही असाच अहवाल शासनाला जातो. हयावर आपण चिंतन करणार आहोत किंवा नाही ?

या धरतीच्या प्राचीनतेएवढी प्राचीनता आदिवासींची आहे. या धरतीचे खरेखुरे वारसदार ते आहेत, मग त्याची लोकसंख्या आज किती असायला पाहिजे ? यावर आपण विचार करणार आहोत किंवा नाही ?

बंधुंनो ! मानवी विकासापासून गुंफाकाल, पशुपालनकाल, कृषिकाल, विकास, उद्योगधंदे त्यात प्रगती, त्यानंतरचा सुवर्णकाळ हा सिंधुसभ्यतेचा काळ होता. जंम्बुदीप हे आदिवासींचे महाद्वीप होय.

त्यात वास करणारे गणप्रमुख व सर्व मूळनिवासी यांचा सामाजिक, सांस्कूतिक, धार्मिक , राजनैतिक विकास झालेला होता व सिंधुसभ्यता भरभराटीस आली होती. जंम्बुदीप, शंभुद्विपसुद्धा म्हटले जात असे. कारण शंभू हा गणप्रमुख महान राजा होता. ज्यांचा इतिहास मोहंजोदडो, हडप्पा ,कालीबंग, लोथल, मुर्वाकोट, दुर्वाकोट, येरूंगगुट्टाकोट, सयमालगुट्टाकोट यातील उत्खनात तत्कालीन भाषा लिपीचे अवशेष मिळाले, त्याचे अध्ययन करणे आवश्यक आहे. सैंधवी सभ्यता (सिंधुसभ्यता) शंभुद्विपवासीयांची भाषा व लिपी स्वतंत्र होती.

ज्याचे सृजनकार वर्तमान काळातील भारतातील मूळनिवासी आदिवासी आहेत. इ. स. पूर्व ३ ते २ हजार वर्षांपूर्वी आर्यांनी आक्रमण करून शंभुसभ्यतेचा विध्वंस करून या भूमीवर आपले वसतिस्थान मांडले. ते खुंखार घोडे घेवून शंभुव्दिपात घुसले. ठिकठिकाणी हमले केले, नागरांची लूट केली. पिकांनी भरलेली शेते पेटवून दिली. रात्री झोपलेल्या जनावारांचे गोठे / कळप पेटवून दिले. अन्नधान्ये कोठारे जाळून टाकलीत. शंभुद्विपवासी प्राणपणाने लढले.रक्तपात रक्तसंहार झाला. लहान मुलांना भाल्याच्या टोकावरती भिंतीमध्ये गाडून टाकले. पुरूषांना मुळासारखे कापून टाकले. धनसंपत्ती खजाने लुटले. स्त्रियांची अब्रू लुटली. त्यांना पळवून नेले, बंदिवास बनविले, किल्ले, महाल, खजान्यांची लूट केली. आर्य युद्धात हरले.

जीवाच्या भितीने काही शरण गेले. दास्यत्व गुलामी पत्कारली, ते आजचे दलित झालेत. आणि जे जीव घेवून रानावनात लपून जगले, ते आदिवासी रानटी झालेत. स्त्रिया व त्यांच्यापासून झालेली संतती ही सेवक, गुलाम, दास म्हणून त्यांना गुरासारखे वागविले. त्यांची सर्रास विक्री केली. शेकडो वर्षे आर्य-अनार्यांचे युद्ध चालले. करोडो अनार्य बेघर, बेसहारा झाले. जल, जमीन, सत्ता, संपत्ती सारे संपून कायमचा वनवास, उपेक्षितपणा, दारिद्रय, दैन्य या चलाख चोरांनी घुसखोरोनी आदिवासींना दिले. तोच तो देवासुरसंग्राम आर्य अनार्याची जयपराजयाची लढाई गाथा - कथा पुराणातून ऐकवितात. या

शंभुद्विपाला आर्यान्रत असे आपले नाव दिले. त्यात १६ जनपदे तयार केली. आपल्या विजययात्रेत लाखो स्त्रिया मुलांना गुलाम, दास म्हणून आपल्या शूर सैनिकांना भेट दिली. विरोध करणा–यांना घोडयाच्या टापेखाली चिरडून टाकले, डोळे काढले, मुंडया उडविल्या, उकळत्या तेलात टाकले. मोठमोठया पहाडांच्या कडावरून खाईत ढकलून दिले. गुलामांना डाग देउन गुलामीची खूण कायम ठेवली. स्त्रियांना राणीवासात उपभोगासाठी ठेवले. अपार लूट केली. तोच अन्याय, अत्याचार अजूनही संपलेला नाही. आजसुद्धा आर्यनीती पासून सुटका झालेली नाही. राजसत्ता आजही कायम आहे. ज्यात इ.स. पूर्व ७०० ते ६०० वर्षात मौखिक कायदे कानून चालत होते. आर्यांनी वर्णव्यवस्था ठरवून ती कायम केली.

इ.स. पूर्व ६ व्या ५ व्या शतकात २ प्रबळ व्यक्ती उदयास आल्या. १) महावीर जैन २) सिद्धार्थ गौतम बुद्ध, हयांनी आर्यव्यवस्थेला प्रचंड विरोध दर्शविला. या दोघांनीही इ.स. पूर्व ६ व्या शतकात स्वतंत्र धर्म स्थापन केले. दुस–या शतकात इ.स पूर्व सम्राट अशोकाने प्रकृतीधर्म, बौद्धधर्म स्वीकारला. सांची येथे बौद्ध स्तुप बांधून भारतभर व बाहेर देशात बुद्धधर्माचा प्रचार व प्रसार केला प्राकृत पालीमध्ये अनेक ठिकाणी शिलालेख कोरण्यात आले. दगडावरती शिल्प / नक्षीकाम केलेले शिलालेख भारतभर लावण्यात आले. यापूर्वीच्या सिंधू संस्कृतीमधील मूळनिवासीयांची स्वतःची स्वतंत्र भाषा व चित्रलिपी प्रचलित होती. चित्रलिपीत संकेत भावार्थ होता. तीच त्यांची मूळची भाषा साहित्य होते.

मोहोंजोदारो, हडप्पा, कलीबंग, लोथड,(म. प्रदेश) माडा. जि. सिंधी, बारसुर (छ.ग.) दंतेवाडा (छ.ग.) निलकोंडा (आंध्र) गोदावरी जिल्हा सिमडेगा (झारखंड) सिंहबोंगा (छ.ग.) सरगुजा मार्कंडा जि. गडचिरोली. कुटंबसारगुफा (छ.ग.) याशिवाय, अनेक ठिकाणी चित्रलिपी मिळाली तसेच औधीची आदिवासी मुर्दावली, गुंमेवाडा जि. दंतेवाडा(छ.ग.) मुर्दावलीमध्ये दगडावर कोरलेली चित्रलिपी मूळनिवासी आदिवासीची कोयालिपी आहे.

इ. स. बाद तिस–या शतकात विक्रमादित्य द्वितीयच्या काळात लोकभाषेवर संस्कार करून ती बोलण्याचा प्रयत्न आर्यानी केला. आर्याच्या ४ वर्ण व्यवस्था पुरोहित (ब्राह्मण), राजा (क्षत्रिय) व्यापारी व्यवसाय उद्योग (वाणिज्य) बाकी हातांनी श्रम करणारे मजूर गुलाम, लाचार सेवक, शूद्र याच वर्गात स्त्रियांनाही ठेवले होते. त्यांच्यापासून झालेल्या मुलांची गुलाम(दास) व स्त्रियांची सर्रास विक्री केली गेली. या सर्व स्त्रिया इथल्या मूळनिवासी यांच्या मुली होत्या. मूळचे शंभूव्दिप आर्याचे शंभूद्विपे रेषाखंडे आर्यावृत्ते असे नाव देवून मूळनिवासीयांचे नावगाव अस्तित्व मिटवून टाकले. ऋग्वेद त्यांचा मौखिक ग्रंथ होता. त्याचप्रमाणे रामायण, महाभारत सुद्धा मौखिक साहित्य होते.

जगाचा औद्योगिक विकास झाला. लोकांनी आपल्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रीत केले. आणि १० व्या शतकात अरब अफगाणांनी आक्रमण केले. हयाचे कारण स्वतःला विकसित करून विश्वावर राज्य करणे, आपली अधिसत्ता कायम करणे हे ध्येय होते. भारतात पुन्हा आदिवासींनी संघटनशक्ती वाढविली. अरण्ये गुंफेतून बाहेर पडून टोळया टोळयांनी आपले अस्तित्व कायम करणे सुरू केले. आपल्या कुलचिन्हाप्रमाणे संघटित होवून आपली गणराज्ये प्रस्थापित केलीत. नागवंशिय सातवाहन, खरवेल, चेंदी, पंडया, यादिंग, वाकाटक, सिरीसटवा, संथाल,

कलचुरी, कोईतुर, काकतेय, बील, कोर, कोया, कोल या अनार्यानी आपल्या राज्याचा विस्तार करून पुन्हा नवीन राजवटी उदयास आल्या, त्यांचे बळ वाढले. समृध्दी, संपन्नता वैभवशाली शिखरावर पोचली. अधिसत्ता वाढली आणि आर्यासोबत लढण्याचे बळ वाढले. त्यामुळे सतत आर्य अनार्याच्या लढाया होत राहिल्या. आर्य जेव्हा- जेव्हा पराजित होत होते, तेव्हा-तेव्हा ते-रूहेल, अरब, युनान, यवन, मंगोलियांना मदतीला बोलवून त्यांच्या मदतीने आदिवासींवर हमले करीत. त्यांचे खजाने संपत्ती लुटून घरांना - शेतांना - जनावरांना आगी लावून मोठ-मोठी महानगरे रात्रीच्या वेळी पेटवून देत. पुन्हा आदिवासींनी आपले संघटन तयार करून गोंडवाना, भिलवाडा, पंडया, खरवेल (उत्कल) यादिंग (यादव) चेदी (चंद्रससा) चन्देल राज्य तयार केले.

म. प्रदेशात, मुंडा, नंद, शुंग, गंग, गुप्त इ. गणप्रमुखांनी आपल्या कुलचिन्हानुसार राज्यशक्ती राजसत्ता स्थापित करून नावलौकीकास आणली. तर नेपाळमध्ये नागांनी आपली सत्ता कायम केली. आर्यांनी मात्र सतत हमले, आक्रमण करून मूळनिवासीयांना पळवून लावले, जिणे हराम केले. बेघर करून गुलाम बनविले. मूळनिवासीय आदिवासीजवळ काय नव्हते? मोठे-मोठे भूभाग, अरण्ये वनसंपदा, जलसाठे, धनधान्य, विपुल संपत्ती, चांदी, सोने, हिरेमोती, जवाहर, रत्ने, पाचूंनी भरलेले खजाने, सुवर्णमुद्रा, सुसज्य सैन्य,राज्य व्यवस्थापन प्रशासन, संगीत, कला, विद्वान, विचारवंत, तसेच शौर्यवीर होते. मोठमोठी हडप्पा मोहोंजोदारो, सारखी भक्कम तटबंदीची सुसज्ज बांधणीची नगरे होती. स्वतंत्र भाषा, लिपी, संस्कृती निसर्ग, धर्म होता. हे सारे जमीनदोस्त झाले आणि आदिवासींचा सुवर्णमयी काळ असा मातीआड केल्या गेला.

सातव्या शतकात दिल्लीची लूट करून बगदादाचा मोहम्मद मीर पळाला . दक्षिणेत जितपलावन इजिप्तमधून आले, तर आर्य नम्ब्रुदी शंकर नामक ब्राह्मणांनी हिंदूंना संघटित करून देशभर भ्रमण करून हिंदू धर्माची स्थापना केली. धर्माची पकड कमजोर वाटली. तेव्हा पुन्हा अरब अमीरात बगदादचा बादशहा मोहम्मद गजनविला व राजपुताना पुरोहितांना निमंत्रण देवून भारतभर आदिवासी राज्यावर चढाया केल्या. ११ व्या शतकात पूर्ण भारत धुवून काढला. संपूर्ण लुटून देशाला निर्धन कमजोर केले. सततच्या लढाया, रक्तपात, जाळपोळ, लुटमार कुतुबुद्दीनने लूट तर केलीच; पण आपला एक गुलाम त्याला सुलतान बनवून भारतात ठेवून तो निघून गेला. त्यावेळी राजपुतांचे छोटी २ राज्ये होती व ते आपसात सुंदर स्त्रियांसाठी एकमेकांचे जीव घ्यायचे. पृथ्वीराज चव्हाणांनी आपल्या भावाच्या सुंदर मुलीला पळवून नेले. तर मोहम्मद घोरीला, जयचंदनी आपला भाऊ व जावयाचा खून करण्यास भाग पाडले.

भारतात १३ व्या १४ व्या शतकात अनेक मूळनिवासी लोक अनार्यासोबत संघटित झाले. १४ व्या शतकात युरोपमध्ये मशीन, कागद, औषधी, मोटार, विमान, जहाज नौकेचा शोध लागला भिलवाडा, विजयनगर, उत्कल, मगध व गोंडवाना राज्य वैभवशिखरावर पोचले होते. बलाढय, शक्तिशाली राज्ये म्हणून हिंदुस्थानात ख्याती होती. कोलंबसने भारताचा शोध करता- करताच अमेरिकेचा शोध लावला. दक्षिण अमेरिकेत पोर्तुगालने गोव्याच्या समुद्रकिनारी विजयनगरात आपला डेरा टाकला. सूरतच्या समुद्रकिनारी ब्रिटिश इंग्रज व्यापा-यांनी बादशहा जहागीरला भरपूर उपहार देवून व्यापार करण्याची परवानगी मागितली. मुगलबारशहाच्या ४ पिढयांनी बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर व

आर्यासोबत मनमुटाव करून आपल्या बहिणी व मुलींना देवून बादशहाच्या दरबारात मोठया पदावर पोचले होते. मूळनिवासियांना मात्र ही संधी कधीच कुणी मिळू दिली नाही व स्वाभिमानी आदिवासींनी राजतत्वानुसार तह केले, मांडलिकत्व स्वीकारले; परंतु लाचारीने कुणाचे पाय चाटले नाही किंवा आपल्या बहिणी, मुली देवून मोठया पदावर पोचले नाही, भिकार होवू पण लाचार नाही हा त्यांचा स्वाभिमानी संस्कृतीचा बाणा आजही कायम आहे.

सुलतान आणि मुगलाचे आधी भारतात नर्मदेच्या उत्तरेस गंगा यमुना ब्रह्मपुत्रा, सिंधू नदीच्या किनारपट्टीत खडीबोली , व्रजभाषा, मागधी मिथीला नागर आणि गोंडी कुडूक सवर, द्रविड तसेच कोकणी बोली होती. नर्मदा, गोदावरी, महानदी कैयमुर परिक्षेत्रात कोया कोल, संथाल, उत्कल बोली होती. मगध राज्य आणि आर्याचे आर्यवृत्ताचे वेळी विंध्याचल सातपुडा कोणीच पार करू शकले नव्हते. सुलतान काळात गुलाम अल्लाउद्दीन खिलजीवंशाने संपूर्ण भारताला जिंकून, एकीकरण करून सर्व राज्यांकडून कर वसूल केला. यानंतर मोगलांनी सुद्धा हेच केले. पुन्हा पूर्वीच्या आर्यांनी मोगलांना पदच्युत करून अफगाणिस्तानानंतर बादशहा नादिरशहाला दिल्लीत खुप लुटले. दिल्ली लुटल्यामुळे मराठाशक्ती लढण्यास तत्पर झाली आणि अशा रीतीने मोगल सल्तनतीचा सूर्यास्त झाला.

भारताच्या पूर्वेस, दक्षिणेस आणि अनेक राज्यावर ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा लॉर्ड क्लाइव्ह व्दारे भारतात सत्ता स्थापित झाली. तो इंग्रजी सल्तनीतेचा विकासाचा काळ होता. भारतीय राजांना ब्रिटिश हुकमात ठेवायचे. बंगालमध्ये प्लासीच्या मैदानावर भारतीय मुसलमान मीर जाफरने मुसलमान सुलतान सिराज उदौलास हरविण्यासाठी इंग्रजांना चंदननगरास बोलाविले. त्याचप्रमाणे स्थानिक राज्यात खानदेश आणि गोंडवानात मराठयांनी आक्रमण करून, कधी इंग्रजासोबत, तर कधी ब्रह्मनीला सोबत घेवून उत्कल, विजयनगर, संथाल परगणा, गोंडवाना व भिलवाडयावर सतत आक्रमणे केली. आर्य, हुड, यवन, अफगाण, मोगलांनी सतत शंभूद्विपावर आक्रमणे करून लुटपाट केले. रक्तसंहार करून त्यांचे राज्ये भूभाग हडप करून त्यांना हाकलून लावले. १४ व्या शतकात मुगल बाबरने शंभुद्विपावर आक्रमण केले व हिंदूच्या मदतीने मुगल सल्तनत कायम केली.

१५ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत मोगल मुक्तीसंग्रामासाठी अनेक आदिवासी वीरांनी व वीरांगनांनी विरोध दर्शविला. गढामंडलाची राणी दुर्गावती, शिनगीदायी रोहतासगढ, उत्कलची राणी सवराने क्रांती युध्दाचे रणशिंग फुंकले. गोंडवाना, भिलवाडा, संथाल परगणातील महिलांनी युध्द पुकारले. गोंडवाना, भिलवाडा, खानदेश आणि ब्रह्मनीच्या पतनानंतर इंग्रजांच्या मदतीने मराठे राजे झाले. मराठयांच्या राज्यांचा उदय झाला. तेव्हा त्यांचे मंत्री पेशवे होते आणि सत्ता १७५१ ते १८५१ पर्यंत कायम ठेवली.

जे जसे करतो तसे भरतो. १७७१ इ.स. मध्ये पानिपतच्या मैदानावर मराठयांची दुनिया बुडाली. इंग्रजांनी सर्व राज्यांना आपल्या अधिनस्त करू लागले. मराठा आणि मोहम्मदशहा अब्दाली पानिपतमध्ये मुगल मराठयांच्या १७७१ च्या रणसंग्रामात मराठयांची कंबर मोडली. अपार धन लुटुन घोडेस्वार गाढवावर बैलगाडयात भरून संपत्ती लुटून असबाब पारसला घेवून गेला.

बंगाल संथाल मध्ये इंग्रजांविरोधात आवाज

उठविणारा आदिवासी तिलका मॉझीने बंड पुकारले. त्याचवेळी वेगवेगळया ठिकाणावरून विद्रोहाचा बिगुल बिहारबंगालच्या जनजातीने वाजविला. सर्वत्र आंदोलन पेटले.१८५७ च्या गदरमध्ये इंग्रजांना हाकलून लावण्यासाठी हे अभियान होते.'' इंग्रजांनो भारत सोडा '' ! हा नारा सर्वप्रथम तिलका मॉझीने दिला. आणि देशभरात विद्रोहाची ठिणगी पडली. गोंडवानाचा शेर शंकरशहा व पुत्र रघुनाथशहा, वीर बाबुराव शेडमाके वीर नारायण सोनाखान, देवनारायणसिंह (रांची), तंटया भिल्ल, भागोजी नाईक, खाज्या नाईक, होनाजी हेंगले, बिरसा मुंडा, सिंद्दू कानो अशा शेकडो आदिवासीनी क्रांतीचे बंड पुकारले. कित्येक आदिवासी शहीद झाले. हा क्रांतीसंग्राम मुक्ती आंदोलन आदिवासीनेच सुरू केले होते व प्राणपणाने नेटाने लढले, इंग्रजांनी त्यांना फासावर चढविले. तुरूंगात डांबले, नाना त-हेने त्यांना छळले. १८८५ मध्ये निवृत्त इंग्रज अधिका-यामार्फत कॉंग्रेस संस्था तयार झाली. त्याच बॅनरखाली विदेशातून शिक्षण घेवून पुढे आले.''ते आर्यांचीच औलाद '' आदिवासींच्या आंदोलनाचे तेच मुखिया म्हणून नाव त्यांचेच झाले. रक्त आमचे सांडले, प्राण आमचे गेले, त्याबदल्यात आम्हास काय मिळाले ? भारत स्वतंत्र झाला. अपमान, दैन्य आणि लाचारी आम्हाला मिळाली.

भारताचा राजपाठ पुन्हा तेच ''पुरानी बोतल मे नई शराब.'' भारतीय इंग्रज विदेशात शिक्षण घेवून तेच शासनकर्ते झाले. आज सुध्दा देशात आर्याचेच संविधान सुरू आहे. सांगायला देश भारत आहे पण आदिवासी भारतीय वाटत नाही, तर ते खरेदी केलेल्या गुलामासारखेच वाटतात. त्यांना डांगोरा पिटवायला फक्त आदिवासी हवे आहेत.

भारतात गोंडवाना राज्य खूप दूरपर्यंत होते. गंगा ते दक्षिण गोदावरी जिथे कोयालिपी आणि कोयांग भाषेचा विकास झाला होता. जी चित्रलिपी होती संथाल परगणा फार मोठा देश, तिथे मगध आणि कुडूख भाषा होती. खखोल (गिधाड कुलचिन्ह) उत्कलवर राज्य होते. दक्षिण कन्नडमध्ये तूलू मलम तामीळ भाषा होती. आदिवासी भाषेमध्ये कोया / कुडुख संथाल, भिली, मागधी, नागा भाषिक क्षेत्र होते. १८१८ मध्ये इंग्रजांनी संपूर्ण देशावर आपली अधिसत्ता कायम करून इंग्रजी भाषेला प्रारंभ झाला. बळजबरीने इंग्रजी देशात आली. सुलतान काळात संपूर्ण भारतात फारशी, अरबी, उर्दू प्रचलित होती. पुरोहित पंडितांनी लोकभाषेवर संस्कार करून संस्कृत भाषा तयार केली. त्याचे अध्ययन वाचन पठण आर्यांनी मंदिरात आणि धार्मिक क्षेत्रात केले. मोठया चतुराईने सर्व भाषांची जननी म्हणून आजही ''गर्व से कहो.....'' म्हणतच आहे.

१५ व्या शतकात गोंडवाना साम्राज्यात गढमंडलाचा सम्राट संग्रामशहा विद्वान राजा होता. त्याच्या वंशात हृदयशहा व महाराजशहा बहादुर राजे झालेत. त्यांना कला, संगीत व साहित्याची आवड होती. ते स्वतः कवी, लेखक, साहित्यिक होते. त्यांनी १. गजनृपेन राज्यम (काव्य) २. रावण्म (काव्य) ३. रसरत्नमाला राणी पदमावती व राजा संग्रामशा मिळून, लिहिलेले तर राजा हृदयशहाने राणी सुंदरी सोबत गजेंद्रमोक्ष (काव्य) लिहिले. १६६८ मध्ये नामनगर मध्ये गोंडवानात राज्य करणा-या ६३ राजांची वंशावली महालाच्या शिलालेखात राजा हृदयशहाने कोरून ठेवली. त्यावरून त्याच्या कुशाग्र बुध्दीमत्तेची व कलासाहित्य अभिरूचीची जाण कळून येते.

संगीतामध्ये अजयगढ प्रसिध्द होता. लोककवी राजा मानसिंह तोमरच्या संगीत दरबार स्पर्धेमध्ये बैजूबावरा आदिवासी संगीतकाराने जगप्रसिध्द इतिहास घडविला. त्याने ग्वालीयरचा संगीतसम्राट तानसेनला हरविले. बैजूबावराने आपल्या संगीत सुराच्या जादुईने रानातील मृगांना बोलाविले आणि मृग मंत्रमुग्ध होवून संगीत ऐकू लागले व बैजूबावरांनी स्वर आळविताना मृगांच्या गळयात पुष्पमाला घातल्या. मृगमोहिनी घातल्याप्रमाणे माना डोलवत होती, झाडे हलत होती, पशुपक्षी आत्मविभोर होवून गात होत. तर मोर नाचत होते, अशा बैजूबाबराच्या संगीत स्पर्धेत तानसेननी भरदरबारात हार मानली. तो म्हणाला ''तुझे आदिवासी संगीत आदिगुरू लिंगोची देण आहे. ते अमर चिरंजीवी व सर्वश्रेष्ठ आहे. ''

खैरागडचा राजा कमलनारायणला जगप्रसिध्द संगीतसम्राट हा बहुमानाचा किताब मिळाला होता. देशभरातील कला, संगीत व साहित्यिकांसाठी रायगड दरबारात मैफिल व्हायची. देशोदशीचे संगीतप्रेमी,साहित्यिक, कलाकार त्यात सहभागी व्हायचे. कला, संगीत, साहित्यावर चर्चा व्हायची. कमलनारायणला सर्व राग, ताल, स्वर, वाद्य, नृत्य त्यातील स्वर व संगीत शास्त्राची अफलातून जाणकारी होती. तो साहित्यिक होता. त्यांची ग्रंथसंपदा व ज्ञानभांडार पाहून आश्चर्य वाटते. त्याची ग्रंथनिर्मीती १. रागमाला काव्य २. शितला जसमलिका काव्य ३. मृगीसत्य काथा ४. काव्यप्रबोध काव्य ५. प्रहर्षलक्षण हे गाजलेले ग्रंथ होते. शितलाजस मलिक हा राग फक्त मातृशक्तीचा गौरव करण्यासाठीच खास लिहिला होता. खैरागढचा २ रा राजा प्रद्युमनाने त्याकाळातील नागवंशिय राजांचा इतिहास लिहिला. ~~तर राजा विरेंद्र~~शहाने उर्दूमध्ये तखल्लस शेरशायरी लिहिली. त्याची राणी पद्मावती सुध्दा साहित्य संगीत कलाप्रेमी होती. संगीतप्रिय होती.त्यांची एकुलती एक कन्या जेव्हा दिवंगत झाली तेव्हा तिच्या नावाणे संगीत विद्यालय काढून, संगीतसाहित्याची अमर पताका कायम ठेवण्यासाठी मोलाचे योगदान दिले. राणी पद्मावती तत्कालीन मध्यप्रान्त राजधानी नागपूरच्या मंत्रीमंडळात कॅबिनेटमंत्री होत्या.

संगीताचे माहेरघर म्हणून रायगडचे नाव हिंदुस्थानात प्रसिध्द होते. राजा भुतदेवचे व्दितीयपुत्र राजा चक्रधर महान संगीतसम्राट होते. 'संगीत सम्राट' ही बहुमानाची पदवी इंग्लंडमध्ये झालेल्या जागतिक संगीत स्पर्धेमध्ये ब्रिटिश काऊंसिलने हा बहुमानाची तुरा राजा चक्रधरच्या शिरपेचात खोवला. आणि आदिवासी संगीतकला ही सर्वश्रेष्ठ आहे, अशी नोंद जागतिक स्तरावर घेण्यात आली. राजा चक्रधर हा संगीतकलेचा पंडीत होता. वाद्य, नृत्य, राग, स्वर हयाचा दांडगा व्यासंग होता. एवढयावरच तो थांबला नाही तर तो महान लेखक कवी व रसिकराज होता. त्याचे भाषेवर प्रभुत्व होते. त्याला इंग्रजी, उर्दू, खडीया, हिंदी, गोंडी, हलवी भाषा येत होत्या. त्याची ग्रंथसंपदा आदिवासी साहित्यामधले मौलिक संपन्न दालन आहे. त्यांनी लिहिलेली उर्दूमध्ये १. निगारे फरहद शेरशायरी २.प्रेमके तीर हिन्दी नाटक ३. काव्यकानन हिन्दी काव्य ४. नृत्यनाटिका नाटक ५. मायाचक्र निबंध ६. रत्नहार कहानी संग्रह ७. बैरागडीया राजकुमार कहानी ८. अलकापुरी तिलस्मी उनन्यास चारखंड ९. रम्यराग संगीत काव्य १०. मृगनयनी कहानी याशिवाय ३५ / ३५ शेर वजनाचे संगीत काव्यखंड मोठे ग्रंथ लिहिले, परंतु १९३९ मधील दुसऱ्या महायुध्दामुळे ते ग्रंथ राजा चक्रधर आजारी झाल्याने व त्यांचे तात्काळ निधन झाल्याने भारतात आणता आले नाही. त्यांची विपुल ग्रंथसंपदा आजही इंग्लंडच्या

म्युझियममध्ये आहे. यावरून आदिवासी साहित्याचे मूल्य व आवाका लक्षात येतो.

खैरागढ राज्यात कवलकांदा याठिकाणी आदिवासी लोकसंगीताचे प्रख्यात ठिकाण होते. आदिवासी लोकगीते, लोककथा व लोकसंगीतावर नृत्य अतिशय लोकप्रिय होते. त्या लोकगीत व संगीतकारावर लोक मोहित झाले होते. कलावती / लचनजती यांची प्रेमकाहानी शिवनाथ महानदीच्या खो–यातील २ हंसाची जोडी त्यांच्या प्रेमकाव्यावरून हे लोकनृत्य सादर केले जाई. आदिवासी तरूण तरूणी जेव्हा नृत्यवाद्य तालावर गाऊन नाचायचे ते पाहून देवार देवारीन गावोगावी जाऊन हे लोकप्रिय नृत्य सादर करायचे. गोंडवानाचे ५२ गढ व ३६ परगणे महाराजा संग्रामशहाचे होते. त्यातील ३६ परगणे शिवनाथ महानदीच्या पलीकडे होते. या संगीतामध्ये ३६ स्वर होते व ३६ परगणे होते.या प्रेमकाव्यावरून व ३६ स्वरांचे ३६ परगण्याचे म्हणून छत्तीसगढ हे नाव पडले. हा इतिहास आहे, आदिवासी लोकसाहित्याचा लोककलेचा !

स्वातंत्र्याच्या लढाईत गोंडवानाचा शेर राजाशंकरशहा, पुत्र रघुनाथशहानी स्वातंत्र्यासाठी क्रांतिलढा उभारल्यामुळे इंग्रजांनी पितापुत्रांना तोफेने उडविले. शंकरशहा हा कवी होता. मातामहाक लीस त्याने प्रार्थना केली.''या शत्रूंना चावून खा आई ! आमच्या भूमीवरून याला पळवून ने'' अशा आशयाची ही कविता

''म्लेंच्छो का मर्दन करो ! कालीका माई
मुखसुख डंकिक को
चुगलो चबाई खाई
खुंद डार दूष्टनको
शत्रु संहारिका''

अशा जळतळत्या शब्दातील लेखन, आगदाह, तळमळ, तडफड, मनाच्या उद्रेकातून क्रांतीची स्फुल्लिंगे चेतलेली दिसतात. १९३२ मध्ये भाषा, साहित्य व सामाजिक स्थिती यावर नागपूर व गोंदियाला संमेलन झाले. त्यावेळी भाषालिपी, लोकसाहित्य व आदिवासींचे कायदे कानून यावर विचारविनिमय करून ठराव शासनाकडे प्रस्तावित केला; परंतु त्यावर तत्कालीन शासनाने विचार केलेला नव्हता.

कुमरा भिमू, आंध्रप्रदेश हयांनी गोंडी भाषेचे आंदोलन चालविले. इंग्रजांविरोधात जिहाद पुकारला आणि ''आमच्या गावात आमचे राज – आमचेच सरकार !''हा नारा भिमुकुमरांनी दिला आहे. स्वातंत्र्यासाठी शहिद झालेल्या क्रांतिवीरांवर कोण लिहिणार ? चंद्रपूरचे यादवशहा आत्राम गोंडलिपी व भाषेचे उत्तम जाणकार होते. संस्कृतीचा दांडगा आभ्यास होता.एक चालते बोलते साहित्याचे दालनच होते. त्यांना गोंडलिपी / मोडीलिपी / मराठी, हिन्दी, उर्दू या भाषा उत्तम प्रकारे यायच्या . डोंगरतालचे रंगेलसिंह भलावी, कोचेवाडयाचे भावसिंग मसराम गोंडीलिपी व भाषेचे प्रचारक होते. त्यांना आदिवासींचा इतिहास, संस्कृती व भाषा लिपीचा अभ्यास होता. त्यांनी गोंडी लिपी / व्याकरण / लोकसाहित्यावर लेखन केले आहे. आदिवासी साहित्याचे सौंदर्यपूर्ण दालन आदिवासींच्या लोकसाहित्याचे दालन अतिप्राचीन व समृध्द आहे. ते स्वयंभू, स्वनिर्मित, सुंदर, संपन्न, समृध्द, सकस आहे. निसर्ग जेवढा स्वयंपूर्ण, शक्तिमान निरंतर, सुंदर, स्वच्छ, संपन्न आणि प्राचीन आहे; तेवढेच आदिवासी साहित्य मौलिक आणि श्रीमंत आहे. जगातल्या सर्व आदिवासीजवळ हा वंशपरंपरेने सुपुर्द केलेला वारसा आहे. तो इतरांकडे नाही. मग मराठी साहित्य व इतर येतोच कुठे ? नाममुद्रेचा शिक्का नसलेले वेगवेगळया

काळातील परिष्करणे सोसून प्रत्येक युगात आपले चैतन्य, आपले शहाणपणाचे संचित लखलखीत ठेवून टवटवीत, हिरवेकंच, चिरतारूण्य कायम ठेवून चिरंजीवी झालेले आहे. सामूहिक जाणीवेतून उत्स्फूर्तपणे जन्मलेले व अशाप्रकारे कालातीर्ण झालेले साहित्याचे अक्षरवाड्.मय अक्षरलेणे ठरले आहे.

ज्येष्ठ साहित्यिक वाहरू सोनवणे म्हणतात '' जी कलाकृती हृदयातून झिरपते आणि हृदयापर्यंत पोहचते. मानवी जीवन फुलविते, सजविते, सुंदर करते, ती लिखित असो वा नसो त्याला साहित्यच म्हणावे लागेल. अलिखित मौखिक साहित्यातूनच जीवनसंस्कृतीचे दर्शन घडते.''

आदिवासींचे लोकसाहित्य नितांत सुंदर आहे. यात कथा, विविध गाणी, लग्नाची, प्रेमाची, शृंगाराची, विनोदाची, देवाची, सणावारांची, शेतीपिकांची, झऱ्या- ताऱ्यांची, झाडेफुले / पाखरांची, शिकारीची, मृत्यूची, दुःखाची, जन्माची, शौर्याची, घटनेनुसार अनेक प्रकारची गाणी, गोष्टी, लोककथा, वाक्प्रचार, म्हणी, मंत्रतंत्र सारेसारे आहे. हा साहित्यांनी भरलेला खजाना त्याचा आस्वाद घेऊन जनलोकांपुढे ठेवण्यासाठी सर्व बोलीभाषांचा, भाषाशास्त्र, व्याकरण, शब्दकोश हयाचा अभ्यास करून नव्या रूपात मांडणी करावी लागेल. हे नवे आव्हान अखिल भारतीय आदिवासी लेखकांना स्वीकारावेच लागेल.

लोकवाङ्मयातील लोकगीताचं सौंदर्य पहा
गोंडीमध्ये.....
''जैसा बाणा टिंजकेन मालाय गोंडानी डो
आमानी टिंगडी डो,
मालाय चोजाआ डो,केंडाना खंबो निडो,
जामा टेंगडी डो, टेरवेला जेनी, पोपटानी डो,
जामा बुतूनडो

गोंडोनी रूपसुंदरी / अतिसुंदर स्त्रीला '' गोंडोनी'' म्हणतात. आई आपल्या लेकीच्या रूपाचे वर्णन करते '' माझ्या सौंदर्यवान मालनचे पाय, जणू केळीचे भरदार खांब, नाक निमुळते, पोपटाच्या चोचीसारखे, चेहरा ओठ लालचुटूक कापलेल्या टरबुजासारखे, गाल चिरंजीच्या तुकडयासारखे, दोन डोळे चंद्र - सूर्यासारखे'' अप्रतिम उच्च कोटीच्या उपमा, प्रतीके आणि उत्तुंग प्रतिभाशक्ती, कोणत्या काळात कोणी निर्माण केली ? हे लिखित नाही म्हणून ते साहित्य नाही काय ? सौंदर्यवान रूपवान नाही काय ? विस्ताराअभावी बाकी आदिवासी भाषेतील गीतांचा उल्लेख करू शकत नाही.परंतु भिलोरी, गोंडी, कोलामी परधानी, मुंडेरी, संथाल, कुडूक व सर्व आदिवासी भाषेतील लोकसाहित्य विपुल आहे.

या लोकसाहित्याचा अभ्यास करून संकलन करून ग्रंथरूपाने महादेव गोपाळ कोळी. गंगाराम जानू, गोविंद गारे, तारा भवाळकर, प्रा. सुमन मुठे, भावसिंग मसराम, डॉ. रामदयाल मुंडा, डॉ. मातीरावण कंगाली, डॉ. माहेश्वरी गावित यांनी केलेले आहे. आदिवासी लोकसाहित्यावर इंग्रजी लेखक व मराठी हिंदी मधीलचे लेखन गैरआदिवासी साहित्यिकांनी केलेले आहे.

बंधूनो ! वर्तमान काळातील साहित्य - महाराष्ट्रात पहिला काव्यसंग्रह १९८२ साली वणी येथे झालेल्या दुस-या संमेलनात प्रकाशित झाला 'मोहोळ'. यात ३३ कवींच्या कविता आहेत. त्यानंतर महाराष्ट्रात व बाहेरच्या राज्यात लिहिणा-या साहित्यिकांची फळी उभी झाली. लेखणीच्या तलवारी घेवून शब्दशस्त्र घेवून मोठया ताकदीने लिहिणारे कवी लेखक आहेत. यात डॉ. गोविंद गारे, व्यंकटेश आत्राम, सुन्हेरसिंह ताराम, बी. एल. कोर्राम, कोमलसिंह मरावी,

बी. आर. वट्टी, उज्जैन सिंह, मोतीरावण कंगाली, डॉ. विनायक तुमराम, मारोती कुळमेथे, नेताजी राजगडकर, सुखदेवबाबू उईके, ऋषी मसराम, लक्ष्मण माने, भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, उषाकिरण आत्राम, बाबाराव मडावी, दशरथ मडावी, वीरसिंग पाडवी, सी. सी. राठवा, रवी कुळसंगे, पुरूषोत्तम शेडमाके, बाळ तिरणकर, डॉ.उत्तमराव धोंगडे, प्रा. माधव सरकुंडे, कुसुम आलाम, प्रभु राजगडकर, अमित गिरडकर, गणेश पतरेकी, कृष्णकुमार चांदेकर, राम चव्हाण , ज्ञानेश्वर मडावी, हर्षलता सुरपाम, रेखा जुमनाके, दादा डोलारकर, सुभाष आडे, मनोज मडावी, सुनील कुमरे, पीतांबर कोडपे, प्रब्रम्हानंद मडावी, मनीराम दुग्गा, शंकर बळी, सिताराम मंडले, लक्ष्मण टोपले, पुंडलीक आत्राम, कविता आत्राम, वसंत कुळसंगे, प्रा. डॉ. माहेश्वरी गावित, चंद्रलेखा कंगाली, रेखा जुमनाके, धिरज शेडमाके, गोविंद गायकी याशिवाय मुंडारी भाषेमध्ये डॉ. प्रेमदयाल मुंडा, रोज केरकेटा, पी.चेशावर, हेमरोड, पत्रकार वासवी, निर्मला पुत्तल, प्रभाकर तिर्की, महली तिर्की, महादेव टोप्पो, गोरचंद मुर्मू, श्रीधरण याशिवाय अनेक साहित्यकांनी व मा. डॉ. प्रेमदयाल मुंडानी मुंडरी, संथाली, कुडूक , सादरी भाषा , लिपी व लोकवाङ्मयावर अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत.

डॉ. गोविंद गारे, वाहरू सोनवणे, वीरसिंग पाडवी, लक्ष्मण टोपले, रमेश वडेरानी भिल्ल भाषेतून वाङ्मयनिर्मिती केली आहे. तर डॉ. गोविंद गारेंनी भिल्ली भाषा, व्याकरण लोकसाहित्य, कथा, कविता, शौर्यगाथा यावर विपुल साहित्य लिहून आदिवासी साहित्याचे दालन लखलखीत केले. सहदेवसोरी, भुवनसोरी व इतर साहित्यिकांनी हलबी साहित्य भाषा व्याकरणावर लेखन केले आहे. प्रा. माधव सरकुंडे, गोविंदा गायिका हयांनी कविता, कथा व लोकसाहित्यावर लेखन करून मोलाची भर घातली आहे. बाबाराव मडावी, दशरथ मडावी, कुसुम अलाम, आपल्या कविता-कथा-आत्मकथनात व लोकसाहित्यात बोलीचा उपयोग करून साहित्य निर्माण केले आहे. गोंडीमध्ये - भुजंग मेश्राम, उषाकिरण आत्राम, डॉ. मोतीराव कंगाली, हनुमंत कुसराम, भावसिंह मसराम, रंगेलसिह भलाची, प्रकाश सलामे, मनीरावण दुग्गा, सिताराम मंडले, सुकदेवबाबु उईके, चंद्रलेखा कंगाली, इत्यादींनी गोंडी भाषेतून कविता, कथा, लोकसाहित्य, तसेच गोंडी भाषा, लिपी, संस्कृती व इतिहास यावर अनेक ग्रंथ लिहून मोतीरावण कंगालीनी गोंडी साहित्यामध्ये हिमनगा सारखी महत्त्वपूर्ण ग्रंथनिर्मिती केली आहे. कुडूक - भाषेवर इंद्रजित उराव - भाषा व्याकरण, कथा, कविता शब्दकोष व लोकसाहित्यावर लेखन केले आहे. संथाली भाषेवर- लाखो बोन्द्रा हयांनी शब्दकोश, भाषा व्याकरण, कविता, लोकवाङ्मयावर लेखन केले आहे. कुरबा भाषेत - डॉ. मैत्री कर्नाटक / कुरबा व गोंडी तसेच कर्नाटकातील गोंड / कुरबा जाती भाषासंस्कृती व लोकसाहित्यावर महत्त्वपूर्ण साहित्यनिर्मिती केली आहे. हिन्दी भाषेत - हिन्दीमध्ये सुन्हेरसिंह ताराम, कोमलसिंह मराई, बी, एल, कोर्राम, पतीराम ताराम, दिलीप परते, प्रमोद पोटाई, उज्जनसिंह वटटी, बिहारीलाल धृव, कृष्णा नैताम, तेजस्वी देवी पूर्रे इत्यादी साहित्यिकांनी कविता कथा / संशोधनपर भाषा लिपी संस्कृती इतिहास व इतर वैचारिक साहित्यावर ग्रंथनिर्मिती करून मोलाचे योगदान दिलेले आहे. तेलगू गोंडी भाषेत - आदिवासी तेलगूमध्ये सिडाम आर्जू, नागोराव मसराम, पुरूषोत्तम कुमरे तेलगू व गोंडी मध्ये कथा / कविता गोंडलिपी शब्दकोष व लोकसाहित्यावर तसेच वैचारिक लेखन करून

आदिवासी साहित्यात मोलाची भर टाकत आहेत. राजस्थानमध्ये हरीराम मीना व शंकरलाल मीना कविता कथा व वैचारीक लेखन करतात. महाराष्ट्रातील आदिवासी कवी, कथाकार, कादंबरी, आत्मकथन, चरित्र, नाटक, शोधनिबंध, वैचारिक लेखन अत्यंत सकस दर्जेदार नव्या ताकदीने लिहिले जात आहे.आशय, अभिव्यक्ती या दोन्ही गुणांनी उज्वल परंपरेचे पाईक होऊन नव्या काव्यकृती एकापेक्षा एक येत आहे.

मा । मानुसकिची लढाई तर लढावीच लागेल
मनुवादी जाळ पेटवायला पक्का निर्धार केला आहे.

भुजंग मेश्राम साहित्यातील खणखणतं नाणं, बहुभाषिक गोंडी, गोरमाटी, परधानी, मराठी भाषेत कविता, एकांकिका, वैचारिक लेखन करणारे, त्यांच्या लेखनाला स्वतःची ओळख आणि वेगळाच बाज होता. अस्खलीत, अस्सल परंपरेचा धागा धरून सहज बोलीभाषेतून वास्तवाची दाहकता मांडण्यात भुजंग मैलाचा दगड होता.'' गाव बांधणी म्हणजी एवढं शिकाचं हाये, यवस्थेच्या छतावडावर आग्या मोहाळावाणी बसायचं होय । 'ऊलगुलान व अबुजाड' या दोन्ही कवितासंग्रहातून गूढसंकेत उकलत खोकलत दाबून ठेवलेली मळमळ मोकळी करूनच शांत श्वास घ्यावा असा कवीचा बिनधास्त पवित्रा.

साहित्यक्षेत्रात चौफेर गुणाचे वादळी अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि १९७९ सालापासून साहित्यिकांना एकत्र आणून आदिवासी साहित्याचे हक्काचे वेगळे दालन उघडण्याचे श्रेय तुमरामांना जाते. त्यांचे 'गोंडवन

पेटले आहे' 'शतकातील कविता' 'धरती आबा', 'मुंगशुजी चरित्र', 'वीरनारायण उईके', 'हलबी कोष्टा कोष्टी' इत्यादी ग्रंथनिर्मिती आहे. त्यांच्या कवितेमध्ये ते म्हणतात.

अमावस्येच्या वादळरात्री
उणावलेल्या आभाळातील ढग चेतवून मी
सुर्यप्रान्ताकडे जाणारे रस्ते हुडकले
तेव्हा अचानक मला, माझ्या गणगोतांच्या
थडग्यांचे गाव दिसले.

अतिशय आशयसंपन्न, अस्वस्थ करणारी, वास्तव टिपणारी कविता तर कवयित्री म्हणून महाराष्ट्रात ख्यातनाम असलेल्या उषाकिरण आत्राम आपल्या 'म्हेरकी काव्यसंग्रहातील' कविता मधून म्हणतात,

शृंगारही आगीसारखा दाहरक असावा
होयाचं असलं तं पयसाची आग व्हायं
गुडयापोडयाच्या डोस्कयात फवलव
कोया अंगार न थोच तुहा शिंगार ''

याशिवाय कुसुम आलाम दशरथ मडावी, बाबाराव मडावी, गोंविंद, गायकी, माधव सरकुंडे, सुनील कुमरे, कविता आत्राम, प्रभू राजगडकर यांच्या कविता अतिशय दाहक सर्जनशील वेगवेगळया विषयावरील आशयसंपन्न तेवढयाच ताकदीच्या आहेत. महाराष्ट्रासोबतच झारखंडच्या कविता

डॉ. मंजू ज्योत्स्ना .....
बुधनी केर, जिनको अंधारे, उठके भात राइंधके, इनवन केर,
कोना से एगो नदिना जे बहेला,
बुधनीने घर झाडून कचरा फेकला पण आयुष्यातला अंधार कोपरा
कसा स्वच्छ करेल ?
रोज केरकटा खडी या भाषेतील कवितेमध्ये म्हणतात
सनेल हे अपा फिइतुड
ओन्डो रे, अल सेनेल ते, पुराये
अरूणाचलचे डॉ. विरेंद्र म्हणतात......
टेरे डेरे टेडे को को को किल्ली
टेरे टेडे वंडो गारो । रोलेंग रोलेंग
बंजारा कविता पी रामकोटी (आंध्र)........
हालो हालो करगी
सोजी सोजी करगी
बालन सवार गी
कोई दगी देई, बालन बाई

याशिवाय कथा, आत्मकथन, आत्मचरित्रे, नाटक, एकांकिका, कादंबरी इत्यादी क्षेत्रात नवनिर्मिती होत आहे.

**कादंबरी क्षेत्र** : नजुबाई गावितची पहिली कादंबरी 'तृष्णा' १९९५ साली प्रकाशित झाली. आत्मवृत्तपर कादंबरी आदोर, रोप, रोपणी व पोराळी अशा ४ खंडात विभागलेली आहे. मावची व भिल्ल पात्राभवती, जनबोलीची वीण घालून भिलाडी भाषेचा साज चढवून श्रमनिष्ठ भिल्लांच्या जखमाची ओळख नजुबाई कुठेही अहम न मिरविता सहज बोलीतून 'तृष्णा' ठेवली आहे.त्यांची 'भिवा भरारी' ही कादंबरी सुध्दा आदिवासी भिल्ल जातीचे काळवंडलेले श्रमांनी, घामांनी, दुखांःनी, काळवंडलेले जीवन, दाहक चटके वास्तवरूपाने डोळयांपुढे येते.

बाबाराव मडावी यांची १९९८ 'टाहो' कादंबरी दीर्घ चिंतनात पाडणारी आदिम जीवनाला अधोरेखांकित करणारी, सावकार ठेकेदार जमीनदारांनी केलेली पिळवणूक लूट वेटबिगारी या विरोधात जबरदस्त ताकदीने संघर्ष केला. त्यातील पात्र, संवाद,

वातावरण निर्मिती, भावभावना वास्तव आहे. दमदारपणे सशक्त संघर्षशील कादबंरी आहे. ' वाडा ही माधव सरकुंडेची आंध जातीवरील कादंबरी. आंधबोली भाषेतील सहजपणा, ओघवती व सरळ भाषाशैली ''आगुदरचं पाणी पाटलालेच का ? आम्ही कां म्हणून शेवटी?'' हया कां च्या प्रश्नांनीच माणूसपणाची भावना स्पष्ट झाली आणि संघर्षासाठी आत्मबळ वाढेल. कादंबरीसोबत कथांच्या क्षेत्रात उषाकिरण आत्रामचा 'अहेर' कथासंग्रहात ६ गाजलेल्या कथा आहेत. माधव सुरकुंडेचा 'सर्वा'(२०००) यात ९ कथा वेगवेगळया विषयावरील झुंज देणाऱ्या, सर्वस्पर्शी मनाला हेलावून सोडणा-या आहेत.

कथालेखनात पंढरीनाथ तामोरे व जयंतवैती या दोन कथाकाराच्या पंक्तीमधे माधव सरकुंडे व बाबाराव मडावी व उषाकिरण आत्राम आलेत. त्यानंतर गोपाळ गवारी यांचे कोळी समाजातील 'वादळ' आणि 'दावण' हे दोन कथा संग्रह (२००६), स्वतंत्र कथा शेख सलीम,'रानातील माणस' (१९८३), सुरेशचंद्र वारघडे, 'अरण्यपुरूष ' (१९९६) त्यांचे 'शूर' आदिवासी मुलांच्या गोष्टी (१९९२), शेफरू आणि मंगरू, 'अस्वल आणि माद्यापावरा', 'दोन साहसकथा', चुडाराम बल्लारपुरेची 'झिपरी' कथा हाकारामध्ये आलेली. 'शिबरी' सुनंदा पाटील, बाबुराव बागुल, केशव मेश्राम भास्कर चंदनशिवेनी सुध्दा आदिवासींवर कथा लिहिलेल्या आहेत. चरित्रग्रंथामध्ये आत्मचरित्रे, दोन क्रांतिवीर-व्यंकटेश आत्राम, शंकरशहा रघुनाथशहा पितापुत्राच्या वास्तवलक्षी प्रेरक इतिहासाचे सोनेरी पान आहे. गोविंद गारे (१९८६) आदिवासी वीर विरांगनांच्या शौर्यागाथांचा इतिहास, जीवनसंघर्ष, धार्मिक सांस्कृतिक औदार्याचा जीवनदृष्टीचा चित्रपट, कर्तृत्वाच्या नोंदी महत्त्वाच्या आहेत. आदिवासी क्रांतिपुरुषांच्या क्रांतिगाथा प्रेरणादायी आहेत. आदिवासी विकासाचे शिल्पकार डॉ. गोविंद गारेनी (१९८२) आदिवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्यांच्या कार्यशैलीवर प्रकाश टाकला, तर ठक्कर बाप्पा (१९८७) डॉ. गोविंद गारे, 'आदिवासी विकासातील दीपस्तंभ' हे चरित्रपुस्तक गोविंद गारेनी लिहिले. डॉ. विनायक तुमरामचे 'वीर नारायण सिंह उईके' 'संत मुंगशुजी' व 'धरतीआबा' हे बिरसामुंडावरील चरित्रग्रंथ त्यांच्या क्रांतिकारी दीपस्तंभाच्या शौर्यगाथेचा गौरव आहे. 'गोंडवानाकी महान विरांगना' (२००८) (हिन्दी) ऐतिहासिक चरित्रग्रंथ यामध्ये १५ आदिवासी महान विरांगनांच्या शौर्याचा, अकबर, इंग्रजांविरोधात पुकारलेले बंड क्रांती करुन मातृभूमीसाठी प्राणअर्पण करणाऱ्या महामर्दानींच्या शौर्याचा इतिहास मोलाचा आहे. नाटके, एकांकिका भुजंग मेश्रामचे 'औतन', 'सवारी' 'मातामाय' आणि 'सोंग', तर पुंडलिक केदारीचे 'भागोजी नाईक', 'छळ', 'विरह', याशिवाय श्री तोडसाम यांचे 'सोने का कुर्सा' (गोंडी), 'जय बुढालपेन' विठ्ठल कन्नाके, दशरथ मडावी यांचे 'महानायक बिरसा', 'थ्री नॉट थ्री', 'संवाद एक मातोशी', तर 'महाबिरसा'- प्रा. वामन शेडमाके, कुंडलिक केदारी 'आली रंगत राणी' (१९९९), 'आक्रोश' (२००३), 'कथा इंद्रपुरीची' (२००५), यापुढे नाटक सरकलेले नाही. इतरांनी आदिवासींवर लिहिलेली नाटके - 'निष्पर्ण वृक्षावर'-रमेश कुबल, 'आसाचा फेरा'-विजय तेंडुलकर, 'स्पेशल ॲक्शनप्लान'-प्रा. विनोद मोरांडे, 'विशाखा', 'राजकारण जपून करा', 'कथा एका त्यागाची', 'अबोली' यासारखी नाटके मोरांडेनी लिहिली. नक्षलवाद, ज्वलंत प्रश्न, संघर्ष, आकांत, न्याय अदिवासी लोकजीवनावर लिहिले आहे.

**साहित्य समीक्षा :** आदिवासी साहित्यावर तसे स्वतंत्रपणे आदिवासी साहित्यिकांनी लिहिलेले समीक्षाग्रंथ नाही. आदिवासी साहित्यिकांनी आता लिहायला पाहिजे. आदिवासी साहित्यकृतीचा अभाव हेच कारण असावे. वृत्तपत्रे, मासिक, दिवाळीअंक, स्मरणिका यांमधून थोडेफार लेखन प्रसिध्द होते, आदिवासी साहित्य-संमेलने, मित्र मेळावे, त्यानिमित्ताने निघणाऱ्या स्मरणिका, अध्यक्षीय भाषणे, कविता, कथा, कांदबऱ्या, स्वकथने, आत्मचरित्रांना लिहिलेल्या प्रस्तावना, आणि प्रकाशित झालेल्या पुस्तकावर परीक्षणे एवढेच साहित्य समीक्षेचे दत्ताऐवज आहेत.

'अर्वाचित मराठी काव्यदर्शन'-डॉ. अक्षरकुमार काळे, आदिवासी कविता समीक्षणात्मक मांडणी, 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह' (१९९३)- डॉ. लिंबाळे, हाकारा महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे (१९८३) मध्ये आदिवासींचे सामाजिक प्रश्न, साहित्यावर लेख  आलेत. मराठीतच नाहीतर हिन्दी गुजराती, बंगाली, तेलगू, संथाली, कुडूक गोंडी, भिल्ली, मुंडारी मधूनही साहित्य प्रसिध्द होत आहे. 'आदिवासी स्वर व नई रोशनी', हा आदिवासी विशेषांक-डॉ. रमणिका गुप्ता दिल्ली (२००२) मध्ये प्रकाशित केला. आदिवासी साहित्य संसद अमरावती, गोंडवाना गोंडी साहित्य नागपूर, गोंडवाना गोंडी साहित्य रायपुर २०१० विशेषांक प्रसिध्द केला. याशिवाय अस्मितादर्श, हाकारा, ढोल, सुगावा, हंस, कथादेश, गोंडवाना दर्शन (रायपूर) - संपादक सुन्हेर सिंह ताराम, आदिसूर्य-संपादक दीपक वळवी, (कोल्हापूर), तारपा-शंकर बळी (मुंबई), आदिवासी सत्ता-संपादक के. आर. शहा (रायपूर), 'आनंदोत्सव' च्या कार्यकारी-संपादक प्रा. डॉ. माहेश्वरी गावित (अहमदनगर), तीरकामठा-नाशिक, गोंडवाना-(चंद्रपूर) वृत्तपत्रे महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहेत.

**संदर्भ ग्रंथ/शोध प्रबंध :** आदिवासी साहित्यिकामध्ये संदर्भग्रंथ/शोधप्रबंध ग्रंथ कमी आहेत. डॉ. विनायक तुमरामचे 'शतकातील आदिवासी कविता', व मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड, (महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे २००९), आदिवासी साहित्याचे संपादन डॉ. विनायक तुमराम (१९५९ ते २०००) ह्यांनी अभ्यासपूर्ण व चिकित्सक वाङ्मयीन दृष्टिकोनातून केलेले आहे. याशिवाय डॉ. माहेश्वरी गावित (अहमदनगर) ह्यांचे

१) महाराष्ट्रातील आदिवासी साहित्य एक शोध (२००८)
२) आदिम जीवनाविष्कार (२००८)
३) लोकसाहित्य: जीवनकला विचार (२००८)
४) आदिवासी साहित्य विचार (२००९)

याप्रमाणे डॉ. माहेश्वरी गावित विद्यादानासोबत साहित्यक्षेत्रात जोमाने पुढे येत आहे. सुनील कुमरे यांचा लेखसंग्रह 'जंगल जिव्हार' मात्र काही ठिकाणी जातीचा आकस ठेवून लिहिला आहे. वैचारिकतेपेक्षा आकस, आक्रस्थाळेपणाकडे कल दिसतो. 'ऊलगुलान'-शंकर बळी, कोकणी कोकणा आदिवासी संस्कृती-सुकलाल कोळी याशिवाय ''आदिवासी मराठी साहित्य स्वरुप व समस्या'' (२००७), 'आदिवासी कादंबरी आणि इतर' (२००५), लेखक डॉ. रमेशचंद्र मुनघाटे दोन्ही ग्रंथ अभ्यासनीय व मौलिक आहेत. याशिवाय 'समाज घटकांच्या व्यथा'-शेषराव मडावी, 'गोंड, गोंडबुरुड, व थोटी वास्तव आणि वाटचाल' - डॉ. विनायक तुमराम, 'आदिवासी स्वायत्त परिषदेची मागणी'-एल. के. मडावी, 'कोरकु जनजीवन'-डॉ. अशोक पाटील, 'पशूपती'-भरतलाल

कोर्राम, 'आई प्रवीरदी', 'आदिवासी गॉड' प्रविरचंद्र भंजदेव 'त्याचप्रमाणे' भाषा लिपी संस्कृती वरील अभ्यासपूर्ण ग्रंथ निर्मिती मोतीरावण कंगाली ह्यांनी केलेली आहे.

'आदिवासी हिन्दू नही है'-कार्तीक उराव २०१०, 'गोंडवाना भुखंड प्रासंगिक कथावस्त'-लेखक कोमलसिंह मरई (भोपाल), व्यंकटेश आत्राम ह्यांचे 'गोंडी संस्कृतीचे संदर्भ' (१९८९ व २००६) 'गोंडवाना का सास्कृतिक इतिहास'-मोतीरावण कंगाली १९८४/ २००५/२०११/४ आवृत्ती 'गोंडवाना गढ दर्शन', 'पारीकुपार लिंगो गोंडी पुनेम', 'गोंडवाना की गौरवनाथा'-डॉ. रामसिया सिंह, 'गोंडवाना कोट दर्शन'--चंद्रलेखा कंगाली, 'गोंडवाना जीवन जगत उत्पत्ती', 'गंढविरों की गाथा'-रंगलसिंह भलावी, 'गोंडी खंड गाथा'-रंगेलसिंह भलावी, 'गोंडवानी परधानी गीतमाला, शेखगुलाम व डॉ. नायक मुंडारी, भाषा व्याकरण शब्दकोष-डॉ. रामदयाल मुंडा त्यांचे, विपुल साहित्यग्रंथ मुंडेरी भाषेमध्ये आहेत. याशिवाय रोज केरकटा प्रो. चेशावर शेमरोड, पत्रकार वासवी किडोचे मुंडारी साहित्यात विशेष योगदान आहे. प्रभाकर तिर्की, महली तिर्की, महादेव टोप्पो, विमल टोप्पो, गोरचंद मुर्मू, श्रीधरन यांचे मुंडारी भाषेत साहित्य आदिवासी साहित्याचे दालन समृध्द करण्यासाठी मोलाचे आहे तर भिल्ली भाषेमधून डॉ. गोविंद गारे, वाहरु सोनवणे, वीरसिंग पाडवी, टोपले यांनीही आदिवासी साहित्यात मोलाची भर घातली आहे. गुजराती जयन्त परमार, अशोकभाई चौधरी, राजस्थानात हरीराम मीना, मिनीमॉन लालो, शोभा येल्मो अशा विविध प्रदेशातील आदिवासी साहित्यिकांनी लोकसाहित्य, भाषा व आपल्या साहित्यामध्ये बोलीचा वापर करुन साहित्याचे सौंदर्य वाढविण्यास विशेष लक्ष घातलेले आहे.

बंधु भगिनींनो, साहित्यामधील इजारदारी, मक्तेदारी भारतातील उच्चवर्गीय साहित्यकार विद्वान पंडितांना समीक्षकांना फार मोठी चिंता लागली आहे. कारण आता दलित, आदिवासी, मागासवर्गीय लिहू लागलेत. हजारो वर्षापासून कालपरवापर्यंत आम्ही जे लिहत होतो, सांगत होतो, ती काळ्या दगडावरची रेष होती. आता मात्र यांच्यामुळे आमचे पांडित्य आमची मक्तेदारी दोक्यात आली. त्यांचे पितळ आता उघडे पडले. मक्तेदारी इजारदारी आता संपण्याच्या मार्गावर आहे.

आदिवासी दलित, मागासवर्गीयाच्या साहित्याला मराठी साहित्य भाषाशास्त्र सौंदर्यशास्त्राच्या कसोट्यामध्ये उतरत नाही. ते त्यांची भाषा शास्त्रशुध्द, व्याकरणशुद्ध, सौंदर्यशास्त्राच्या चौकटीत बसत नाही. त्याला शास्त्राचे आधार नाही. म्हणून ते साहित्य नाही. ते दर्जेदार मौलिक नाही. त्यात अलंकार उपमा शुध्दता नाही. म्हणून ते मराठी साहित्याच्या प्रस्थापितांच्या साहित्यकक्षेत बसत नाही. मौलिकदृष्ट्या ते कमी दर्जाचे आहे अशीच प्रतवारी केली जाते व यापुढेही करणार हे आदिवासी साहित्यिकांना आव्हान राहील हे लक्षात घ्यावे लागेल.

आदिवासी साहित्याचा क्रांतिघोष सर्वत्र होत आहे. जुने मौखिक साहित्य, आदिवासींच्या बोलीभाषेतील साहित्य आज लिहिले जात आहे. कविता, कथा, आत्मकथने, शोधग्रंथ, भाषा व लिपीवर संशोधन होत आहे. ही भविष्यकाळासाठी फार मोठी नांदी आहे.

माझ्या बंधू भगिनींनो ! आदिवासी साहित्य हे कल्पनेच्या भराऱ्या मारणारे नाही. वास्तववाद, समूहवाद मानणारी आपली संस्कृती आहे. शूरवीरांची,

शूरविरांगनांची आपली संस्कृती आहे. राजकर्त्यांची आपली संस्कृती आहे. निसर्गाला मानणारी, सर्वांना सोबत घेवून शांतता, प्रेम, दया, सहकार्य व प्राणिमात्रांवर, वनस्पती, झाडे-झुडपे, दऱ्याडोंगरावर प्रेम करणारी संस्कृती आहे. त्यातील चांगले उच्च कोटीचे तत्त्वज्ञान आहे. ते आपल्या साहित्यामधून चित्रांकित झाले पाहिजे.

बंधूनो ! जे कधी लढलेच नाही, ज्यांनी कधी इतिहास घडविलाच नाही, त्यांच्या शौर्यगाथा आपण बिनदिक्कतपणे गातो. त्यांचीच आरती करतो, पण आपण आपल्या शूरविरांना, शूरविरांगना मातांना विसरलो आहोत. उदाहरणच द्यायचे झाल्यास सुभद्राकुमारी चव्हाण १९३५ मध्ये (बसदेवा) फिरून भिक्षा मागणारा व गीत गाणारा, त्यांनी विरांगना लक्ष्मीबाईला कधी पाहिले नव्हते, परंतु लोकांकडून ऐकले होते. ''क्या खूब लढी मर्यानी झॉसीवाली राणी थी, बसदेवाके मुख से सुनी हुयी कहानी थी ।'' प्रत्यक्षात राणीचे वस्त्र घालून झाशीच्या झलकारीने रणांगणात युध्द केले. इंग्रजासोबत लढली आणि शहीद झाली. झासीची राणी लक्ष्मीबाई तर चोररस्त्याने कधीच जीव घेवून सुरक्षित स्थळी राहिली होती. जीव गेला झलकारीचा, मैदानात रणरागीनी होऊन लढली झलकारी, पण इतिहासाच्या पानावर नाव लिहिले गेले लक्ष्मीबाईचे, लिहिणारे कोण होते. तुम्ही आम्ही नव्हतो बाबांनो. पंडीत होते, लेखणीचे ताबेदार मक्तेदार होते. म्हणून तर आपल्या हजारो पिढ्या गारद झाल्या, राज्य गेले. प्राण गेले, जमीन जंगल सारे गेले, बेघर झालो, पण ज्यांचा इतिहास जिवंत असेल त्याला मरण नाही. आपला इतिहास आपले साहित्य नव्या दमाने लिहा. भाषेला मारू नका. आपल्या गोंडी, भिल्ली, मुंडारी, संथाली, कुडूक, कोलामी, आंध, कोर, ज्या ज्या बोलीभाषा आहेत. त्या मरु देवू नका, त्यांना जिवंत ठेवा. त्यावर संशोधन करा अभ्यास करा. व आपल्या भाषेतील सौदर्य आपल्या साहित्यामध्ये येऊ द्या. काळाच्या प्रत्येक स्तरावर आपल्या लिप्या कोरलेल्या आहेत त्याचे संशोधन करा. बोला, लिहा, आपली भाषा संस्कृती व साहित्य अतिप्राचीन आहे हे विसरु नका ! आपसात जमातवाद, जातीभेद करु नका. संघटित राहून साहित्य निर्माण करा. शेवटी आपण सर्वांनी माझे लांबलेले भाषण ऐकून घेतले. त्याबद्दल सर्व रसिक श्रोत्यांना मी धन्यवाद देते. माझ्या भाषणातून कोणाच्या भावना दुखाविल्या असल्यास क्षमा करावी।

***''शब्दांची पूजा करीत नाही, मी माणसासाठी आरती गातो***

***ज्यांच्या गावात सूर्य नाही, त्यांच्या गावात उजेड देतो !!***

*धन्यवाद !*

• • •

# महाराष्ट्रातील आदिवासी लोकसाहित्याचे संशोधन स्वरूप व दिशा

**प्राचार्य डॉ. मोतीराम देशमुख**
हरसूल, नाशिक

लोकसाहित्याचा शास्त्रीय अभ्यास करणाऱ्या पाश्चात्य लोकसाहित्य विशारदांनी लोकसाहित्य हे परंपरागत चालत आलेल्या लोकजीवनाचा आविष्कार आहे, हे लक्षात घेऊनच लोकसाहित्याचा समाजशास्त्रीय दृष्टीनेही अभ्यास केलेला आहे. याला कारण लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचे अभिन्नत्व होय. समाजाच्या जीवन जगण्याच्या पध्दतीची नोंद लोकसाहित्यात असल्याने या जीवनाचे विविध पैलू आपल्याला लोकसाहित्यात पाहवयास मिळतात. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा परस्पर संबंध लक्षात घेउनच आदिवासी लोकसाहित्यातून आविस्कृत होणाऱ्या लोकजीवनाचा परामर्श घेणे आज आवश्यक होऊन बसले आहे.

लोकजीवनाची जीवन जगण्याची पध्दती, लोकजीवणातील आचार-विचार, विधी आणि लोकसंस्कृती इत्यादींचे लोकसाहित्यात पडलेले पाहावयास मिळते. लोकजीवनाच्या विविध भावनात्मक रंगछटाही या लोकसाहित्यात सापडतात. लोकसाहित्याचे काही घटक आकार घेत असतात. याचा अर्थ लोकसाहित्यातील या घटकांना लोकजीवनाचा स्पर्श झालेला असतो. आदिवासी लोकसाहित्यातूनही या घटकांचा परिचय घडून येतो.

मी केवळ महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य यावरच प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न ~~केला आहे.~~ वरील विषयावर शोधनिबंध लिहीत असताना विस्तार भयास्तव सर्वच सूत्रे, मुददे सविस्तरपणे मांडता येतीलच असे नव्हे. शिवाय प्रत्येक आदिवासी संशोधक अभ्यासकाच्या कार्याचा परिचय व त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करणे तसे अवघडच आहे. काही वेळा नामनिर्देश करणे म्हणजे एक प्रकारे दिशादर्शन करण्याचा प्रयत्न केला जातो. खरे पाहता तोही संशोधनाचाच एक भाग आहे.

आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात ४ था क्रमांक लागतो. राज्यातील बहुतेक आदिवासी जमाती या ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, अ.नगर, पुणे, अमरावती, यवतमाळ, नागपूर, नांदेड, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, रायगड या जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणात आढळतात. महाराष्ट्रातील या वरील जिल्हयांमध्ये प्रामुख्याने भिल्ल, महादेव कोळी, मल्हार कोळी, वारली, कोकणा, कातकरी, ठाकर, लमाण (बंजारा), गावीत, गोंड, कोलाम, कोरकू, आंध, धोडिया, दुबळा, माडिया, परधान, पारधी, निहाल, राठवा, बसोडा, भिलाल, बलई, गवळी या प्रमुख आणि इतर लहान-मोठया अशा एकूण ४७ आदिवासी जमातींचे लोक राहतात.

आदिवासी म्हणजे धरतीची लेकरं, आदिवासी म्हणजे लोक समाजात प्राचीनतम भाग, आदिवासी म्हणजे भोळाभाबडा, निसर्गपूजक आणि पर्यावरण रक्षक, त्यांच्या प्राचीन परंपरा, रूढी, प्रथा,

चालीरीती, त्यांची भाषा,रंगीबेरंगी पोशाख, सामुदायिक जीवन, सुखदुःखातील सामुदायिक सहभाग, अद्भूतरम्य आणि बहुरंगी उत्सव, सण उत्सवातील नैसर्गिक आणि परिपूर्ण आनंद, त्यांच्या देवदेवता या सर्वच गोष्टी अभ्यासक संशोधकांना मोहविणाऱ्या आहेत.

आदिवासी लोकसाहित्य हा परंपरेने जतन केलेला व मौखिक आविस्कारातून पुढच्या पिढीकडे आलेला वारसा आहे. या लोकसाहित्याचे अध्ययन आणि संशोधनाची पहिली पायरी खरे तर लोकसाहित्याच्या संकलन आणि संपादन ही आहे. रामायण, महाभारतातील अनेक लोककथा, पौराणिक लोककथा येथील निरक्षरांकडे मौखिक परंपरेने चालत आलेल्या आहेत. लोककथा, लोकगीत, म्हणी, उखाने, वाक्प्रचार, लोककला, लोकनाटय या भूमीत रूढ आहेत.

आदिवासी लोकसाहित्यातून आणि लोकभाषेतून लोकमनाचा लोकसंस्कृतीचा समृध्द आविष्कार होताना दिसतो. आदिवासी लोकसाहित्याचा निर्माता हा कुणी एक विशिष्ट घटक वा व्यक्ती नसून संपूर्ण समाजच त्याच्या निर्मितीला कारण असतो. विशिष्ट स्थानिक परिसरातील लोकसमजुती,लोकविश्वास अशा विविध घटकांचे विविधांगी दर्शन मौखिकतेतून,संभाषिक लोकाचारातून अभिव्यक्त होते. हे आदिवासी लोकसाहित्य ज्या भाषिक परिसरातून प्रवाहित होत असते त्या भाषिक परिसरातील रूढी, परंपरा, लोकसमजुती, जीवनाविषयीच्या दृढमूल धारणा या सर्वांचे दर्शन त्यातून घडते. यासह संबंधित लोकमनाच्या समृध्द आविष्काराचेही प्रकटन दिसून येते.

आदिवासींची लोकगीते, लोककथा, लोकनाटय, लोककला, म्हणी, उखाणे, वाक्प्रचार अशा मुख्य प्रकारांतून आदिवासी लोकजीवनाची बहुविधता आशयबध्द होते. त्यातील मूल्यात्मक बाबींचे दीर्घकाळ जतन केल्याचे निदर्शनास येते. एक प्रकारे या लोकसाहित्यामुळेच त्यांचे लोकजीवनाला संस्कारक्षमता लाभली आहे. आदिवासी लोकसाहित्याने सर्वसामान्यांचे लोकशिक्षणाची गरज भागविली आहे. प्रबोधनाची गरज भागविली आहे. शिवाय श्रमपरिहारासाठी आवश्यक असणारे मनोरंजनाचे कार्य त्याने केले आहे.

आदिवासी लोकजीवनातील विविध जमातीमध्ये विधींना अत्यंत महत्व आहे. या विधी आणि लोकगीते यांचा जवळचा संबंध आहे. बाळ जन्माचा विधी, लग्नाचा विधी,मर्तिकेचा विधी, सण-उत्सव, कुळाचार या विधींमध्ये गीतांना आदिवासी लोकजीवनात मंत्राइतके महत्व असल्याचे जाणवते. मानवी जीवनातील सुखदुःखाच्या भावना, धीर गंभीर प्रसंग आणि मानवी स्वभावाच्या विविध छटाही आदिवासी लोकसाहित्यातून व्यक्त होणारे लोकजीवन आणि समाजमन महत्वपूर्ण असून सामाजिक जीवनाचे अनेकविध विशेष त्यातून पाहवयास मिळतात. निरनिराळया सामाजिक अवस्था समाजजीवनात होणारे परिवर्तन आणि या सामाजिक परिवर्तनास साहाय्यभूत ठरलेले घटक यांचाही परिचय आपणास आदिवासी लोकसाहित्याच्या अभ्यासातून होतो.

आदिवासी लोकजीवनावर धार्मिक परंपरा, पुराणे, निसर्ग देवता यांचा अधिक प्रभाव पडलेला दिसून येतो. देवदेवतांविषयीची श्रध्दा अनेक लोकगीतांमधून व्यक्त झालेली दिसून येते. समाजजीवनात राम, लक्ष्मण, सीता, पांडव, श्रीकृष्ण, विठोबा या देवदेवतांसोबतच महादेव, मारूती, खंडोबा,

म्हाळसा, आसरा, म्हसोबा, सटवई, चंद्र-सुर्य, वाघदेव, गावदेवी, पांढरी, मरीआई इत्यादी ग्रामदेवतांविषयी असलेली श्रध्दा तसेच अंधश्रध्देच्या पोटी समाजजीवनात प्रचलित असलेल्या काही अंधश्रध्दा, रूढी, प्रथा आणि त्यापोटीच समाजजीवनात प्रचलित असलेल्या काही अद्‌भूतविधीचा उल्लेखही आदिवासींचे लोकसाहित्यातून आढळतात. या सर्व बाबी आदिवासींचे समाजजीवनात किती खोलवर रूजल्या आहेत याचे ज्ञानही आपणास त्यांचे लोकसाहित्यातून पाहावयास मिळते.

आदिवासींच्या लोकसाहित्यामुळेच त्यांचे लोकसंस्कृतीचे जतन आणि जोपासना झाली आहे हे नाकारता येणार नाही. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन आपणास घडते, याला कारण लोकसाहित्यात टिकून राहण्याची प्रवृत्ती असते. लोकसाहित्यातील या विशेषामुळेच एखादा लोकसमूह त्यांची पारंपरिक आणि सांस्कृतिक विशेषांच्या आधारे आपल्याला लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

आदिवासींच्या लोकजीवनात रूढी, प्रथा, परंपरा आणि विधींना महत्वाचे स्थान आहे. या साऱ्यांचा त्यांचे समाजजीवनावर बराच पगडा असल्यामुळे हे विधी पार पाडताना करण्यात येणारे विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम यांनाही त्यांचे लोकसाहित्यात महत्व येते. या रूढी, प्रथा, परंपरा आणि विधी यामुळे त्या-त्या जमातीचे संस्कृतीची ओळख आपणास आदिवासींच्या लोकसाहित्याव्दारे होते. परमेश्वर हा दुःख दूर करणारा आणि दुःखितांना आश्रय देणारा तसेच नवसाला पावणारा आहे. या दृष्टीने आदिवासी परमेश्वराकडे पाहतात. त्यातूनच विविध विधी, उत्सव आणि नवसांची निर्मिती होऊन आदिवासी लोकजीवनाला धार्मिकतेचा स्पर्श झाला. अनेक कुळाचारांची निर्मिती झाली. त्यात दिवसेंदिवस भर पडतच गेली. धार्मिक विधी आणि कुळाचार यांची पूर्णता देवदेवतांच्या निरनिराळया उपासकांनी लोकसंस्कृती संवर्धनास हातभार लावला. आदिवासी लोकसाहित्यातील लोकगीते, लोककथा, लोकनृत्य आणि लोकसंगीत यांचे अभ्यासाने त्यांची मूळ संस्कृती आणि आचार-विचार यांचेही दर्शन घडते.

कुठल्याही लोकसमूहाच्या जीवनावस्थेचा अभ्यास करताना लोकसाहित्य अतिशय महत्वपूर्ण ठरते. शिवाय संस्कृतीच्या सत्वाची जपणूक लोकसाहित्यातून अधिक सक्षमतेने होत असते. त्या त्या समाजातील जीवन व्यवहाराच्या पध्दती आणि त्यातून त्यांच्या जीवनाला येणारी समृध्दता यांचा शोध घेण्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

गेल्या तीन दशकांपासून महाराष्ट्रातील आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास होउ लागला आहे. आजवर आदिवासी लोकसाहित्य या विषयावर झालेल्या संशोधनाची माहिती व्हावी व कोणकोणत्या अंगानी या लोकसाहित्याचे संशोधन होणे आवश्यक आहे. याचे दिशादर्शन पुढील अभ्यासकांना व्हावे, हा  हेतू खरेतर या लेखामागील आहे.

आजवर महाराष्ट्रातील पुणे, नागपूर, अमरावती, नांदेड, मुंबई, औरंगाबाद, विद्यापीठात पीएच.डी. पदवीसाठी खालील अभ्यासकांनी लोकसाहित्य या विषयाशी संबंधित विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले आहे.

१) वारली बोली व लोकगीते यांचा अभ्यास - डॉ. जनार्दन रानडे (पुणे)

२) अहिराणी लोकगीते : सांस्कृतिक, वाङ्.मयीन

व भाषिक अभ्यास - डॉ. शामराव सूर्यवंशी

३) नाशिक जिल्हयातील आदिवासी कोकणा जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास-डॉ. बबन पवार

४) नाशिक जिल्हयातील आदिवासी कोकणा जमातीच्या लोकगीतांचा व लोकसंस्कृतीचा चिकित्सक अभ्यासक- ड. मोतीराम रावजी देशमुख (नाशिक)

५) आदिवासी महादेव कोळी समाजाच्या लोकसाहित्याचा अभ्यास - डॉ. संजय लोहकरे

६) महादेव कोळी समाजातील लोकसाहित्याचा वाड्.मयीन दृष्टीकोनातून अभ्यास- डॉ. गोपाळ गवारी

७) मालेगाव तालुक्यातील भिल्ली लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास - डॉ. जीजा सोनवणे

८) नवापूर परिसरातील आदिवासी लोकसाहित्याचा वाड्.मयीन सांस्कृतिक अभ्यासः डॉ. विजया सोनार

९) डहाणू तालुक्यातील लोकगीतांचा अभ्यास : डॉ. भगवान राजपूत

१०) भिल्ली लोकगीते - सामाजिक आणि वाड्.मयीन अभ्यास - उषा सोरटे

११) लमाण(बंजारा): लोकजीवन व लोकसाहित्य (अ.नगर) - डॉ. अनिल गर्जे

१२) भवाडा लोककला आविस्कार : एक अभ्यास : दौलतराव पवार

१३) आदिवासी ठाकर आणि त्यांच्या विवाहप्रसंगी म्हटली जापारी लोकगीते : मा. रा. लामखेडे

१४) अकोले तालुक्यातील आदिवासी महादेव कोळी यांची विवाहगीते : एक अभ्यास : रंजना करवंदे

१५) मालेगाव तालुक्यातील दाभाडी परिसरातील भिल्लीगीते : एक अभ्यास : जीजाबाई सोनवणे

१६) कळवण तालुक्यातील कोकणी लोकगीते : एक अभ्यासः महादू बागूल

१७) विदर्भातील आदिवासी लोकगीतांचा अभ्यास. (गोंड, माडिया, कोलाम, परधान) डॉ. कल्पना महाक्षेत्री (यवतमाळ)

१८) मेळघाटातील आदिवासींचा सांस्कृतिक व भाषिक अभ्यास-डॉ. मनोज तायडे(अमरावती)

१९) मेळघाटातील कोरूकू आदिवासींच्या लोकगीतांचे संकलन व विश्लेषण-डॉ. सुखदेव ठाणके

२०) मेळघाट परिसरातील भिलाला जमातीच्या लोकसाहित्यातून आविस्कृत होणारे जीवनः एक अभ्यास- डॉ. मंदा नांदुरकर (अमरावती)

२१) कोरकू आदिवासींच्या पारंपरिक मौखिक गीतांचा लोकतत्वीय अभ्यासः श्रीकृष्ण राऊत

२२) कोलाम जमातीची लोकबोली - डॉ. भाऊ मांडवकर (यवतमाळ)

२३) विदर्भातील आदिवासी लोकगीतांचा अभ्यास : डॉ. कल्पना म्हशाखेत्री (नागपूर)

२४)गडचिरोली जिल्हयातील आदिवासींचे लोकसाहित्य : डॉ. युवराज सेलोकर

२५) चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील लोकसाहित्य : डॉ. सुनिता कोंडबत्तुनवार

२६) बंजारा बोलीतील लोकसाहित्याचे स्वरूप व

प्रेरणा - डॉ. अरूण जाधव

२७) भंडारा जिल्हयातील दंडार या लोकनाटयाचा अभ्यास : डॉ. मधुकर नंदनवाड

२८) भंडारा व गोंदिया जिल्हयातील तमाशा या लोकनाटयाचा आभ्यास- चंद्रकुमार राहुले

२९) गडचिरोली जिल्हयातील आदिवासींच्या लोककथा - डॉ. शितल रेगूलवार

३०) अहिराणी लोकसाहित्याची वैशिष्ट्ये : डॉ. दा.गो.बोरसे

३१) मेहकर परिसरातील लोकगीते - डॉ. इंदूमती लहाने

३२) गडचिरोली जिल्हयातील गोंड, माडियांच्या लोकसाहित्याचा अभ्यास - डॉ. चिमण्णा चालुरकर

३३)झाडीपटटीतील 'खडी गंमत' या लोकनाटय प्रकाराचा अभ्यास - देवेंद्र खडगी

३४) मराठवाडयाच्या पूर्व सरहद्दीवरील लोकसाहित्य (मराठवाडा विद्यापीठ)

३५) गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्य

३६) लोकगीतातील स्त्री प्रतिमा/ प्रतिमा सृष्टी/ स्त्री गीते/ समाज दर्शन

३७) आदिवासींची लोकगीते/स्त्री गीते

३८) आदिवासी पावरा लोकगीते, ठाकरांची लोकगीते, कातकऱ्यांचे लोकसाहित्य, कोरकू जमातीचे लोकसाहित्य, कोळी जमातीचे लोकसाहित्य, स्त्री-पुरूष चित्रण.

गोंड जमातीची लोकगीते, पुराणकथा व लोककथांचे कल्पनाबंध.

आहिरणी बोली व लोकसाहित्यः भाषाशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यास.

वरील यादीवरून असे निदर्शनास येते की, आजवर झालेले हे संशोधन आदिवासी संस्कृती व लोकगीते, अहिराणी बोली व लोकसाहित्य, वऱ्हाडी बोली व लोकसाहित्य, स्त्रीजीवन व लोकसाहित्य, ग्रामदैवते व लोकगीते, लोककला, तमाशा, दंडार, भोवाडा, विशिष्ट समाजाचे लोकसाहित्य, लोककथा, विवाहगीते, अशा विविध दृष्टीकोनातून आदिवासी लोकसाहित्य,लोककथा,विवाहगीते, अशा विविध दृष्टीकोनातून आदिवासी लोकसाहित्याचे संशोधन प्रामुख्याने झालेले दिसून येते. मूळ संशोधन किंवा मार्गदर्शक त्या-त्या परिसरातील असावेत असेही यादीवरून वाटते. दुसरे असे की, लोकसाहित्याच्या संशोधकांना लोकगीते अधिक आकर्षित करीत असावेत, त्यामुळेच कदाचित संशोधनात लोकगीतांना अधिक प्राधान्य दिले असावे.

आदिवासी लोकसाहित्याचे वऱ्हाडी, अहिराणी, झाडीपटटी, विदर्भ, मेळघाट अशा भौगोलिक विभागाप्रमाणे, नाशिक, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया अशा जिल्हयावार विशेषानुसार मालेगाव, नवापूर, डहाणू, साक्री, अकोले, कळवण, तळोदे, मेहकर असा तालुकावार तर कोकणा, गोंड, कोलाम, कोरकू, बंजारा, काळी, कातकरी, ठाकर, वारली, भिल्ल, गोल्ला, लमाण, अशी सामाजिक वर्गवारीही आदिवासी लोकसाहित्याच्या संशोधनात दिसून येते.

प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये विवाहप्रसंगी गाणी म्हणण्याची प्रथा प्रचलित आहे. महाराष्ट्रात सर्वच जमातींमध्ये वैविध्यतेने नटलेले विवाहविधी पाहावयास मिळतात. त्यादृष्टीने विविध जमातींमधील

विवाहपध्दती बोलीभाषा, विवाहगीते तसेच विवाह गीतांचा तैलानिक अभ्यास. विवाहनिमित्ताने प्रचलित असलेल्या विविध प्रथा उदा. वरमाई, झालझेंडा आणि त्यासंबंधीच्या लोकगीतांचा अभ्यास करता येईल.

आदिवासी लोकसाहित्यातून होणारे नीतिशिक्षण, लोकसाहित्यातील मूल्यदर्शन, लोकसाहित्यातील निसर्गसंपन्नता, लोकसाहित्यातील कल्पनासौंदर्य-भावसौंदर्य-विचारसौंदर्य-भाषासौंदर्य, लोकसाहित्यातील शब्दकळा, लोकसाहित्याचे साहित्यमूल्य, लोकसाहित्यातील सौंदर्य घटकांचा अभ्यास, लोकसाहित्यात दडलेला इतिहास, लोकसाहित्याचा ऐतिहासिक-भौगोलिक पध्दतीने अभ्यास, लोकसाहित्यातून प्रकट होणारी चित्रलिपी, क्षेत्रदेवता-लोकदेवतांची परंपरा त्यांचे विधिसंकेत आणि लोकसाहित्य. अशा विषयांवर आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास करता येणे शक्य आहे.

आदिवासी लोकगीतांची संहिता निश्चित करणे, लोकगीतांतून व्यक्त होणारी लोकसंस्कृती, लोकगीतातील प्रतिमासृष्टी, लोकगीतांतील शृंगारभाव, लोकगीतातील कृषीदर्शन, लोकगीतातील नातेभाव, लोकगीतातील बहिण भाऊ, लोकगीतातील मायमहिमा, लोकगीतातून प्रकट होणारे अहेव मरण विषयक गीते, विविध बोलीतील रामायण-महाभारत विषयक लोकगीतांचा अभ्यास स्त्रीविषयक लोकगीतांचा मानसशास्त्रीय अभ्यास, लोकसाहित्याचा स्त्रीवादी दृष्टीकोनातून अभ्यास, पौराणिक संदर्भ असलेली स्त्रीगीते, पुरूषगीते, बडबड गीते, विविध बोलींतील लोकगीतांचा तौलनिक अभ्यास, लोकमानस व लोकपरंपरा यांचा परस्पर अनुबंध शोधणे, लोकजीवनातील म्हणी, उखाणे, वाक्‌प्रचार व शब्दसंपत्ती, म्हणींची समाजभाषा-मूल्यभाषा व वाङ्.मयीन सौंदर्याचा शोध, म्हणीतून घडणारे समाजदर्शन, बोलीभाषेतील उखाणे व त्यातूप घडणारे समाजदर्शन, आदिवासी जमातींच्या विविध बोली भाषेचा अभ्यास तसेच बोली भाषेंचा तौलनिक अभ्यास करता येणे शक्य आहे.

विविध आदिवासी बोलीतील रामायण-महाभारत विषयक लोककथा, लोकसाहित्यातील लोककथा, विविध बोलींतील लोककथांचा तौलनिक अभ्यास, दंडार, तमाशा, भोवाडा, डोंगरीदेव उत्सव, कुलदैवतउत्सव, देवदेवता-कुलदैवत यामागील प्रथा आणि लोकपरंपरा, वरील प्रसंगी म्हटली जाणारी लोकगीते अशा अनेकविध अंगांनी आदिवासी लोकसाहित्याचे संकलन, संपादन आणि संशोधन होऊ शकते.

आदिवासी लोकसाहित्य हा एक कलाप्रकार आहे. लोकसाहित्यात अभिव्यक्तीचे साधन असलेले शब्द हे नादरुप किंवा ध्यनीरुप असतात. आदिवासींचे लोकसाहित्य हे प्रामुख्याने गायिले, ऐकवले अथवा सादर केले जाते. त्यादृष्टीने आदिवासी लोकसाहित्याचे सादरिकरण व सादरीकरणाची रीती, लोककला व लोकसंगीत, लोकगीते व लोकसंगीत, थाळगाणं, लोकनाट्य व लोकवाद्ये, विधीनाट्य असा आदिवासी लोकसाहित्याचा प्रायोगिक अंगानेही अभ्यास करता येणे शक्य आहे.

लोकनाट्य ही प्रयोगसिध्द कला आहे. ते बहुधा लोकवाद्यांच्या साथीनेच सादर होते. जागरण, दंडार, भारुड, भोवाडा, तमाशा ही लोकपरंपरेने चालत आलेली नाट्यात्मक आविष्कारांची रुपे आहेत. आदिम अवस्थेत मानव आपल्या सुरक्षिततेसाठी भावात्मक विधी करीत असे. विश्वातील या शक्तीद्वारेच आपल्याला इच्छीत घटना घडवून आणता येतात

अशी त्यांची धारणा होती. उदा. पाऊस पडावा, पीक चांगले यावे इ. बहुतांश आदिवासी लोकविष्कारांची निर्मिती धार्मिक श्रध्देतून झालेली असली तरी काही आविष्कार केवळ लोकरंजणासाठीच आले आहेत. त्यात धार्मिक भाग असलाच तरी तो अगदी कमी प्रमाणात आहे.

धर्मश्रध्देतून आदिवासी नृत्यांचा उगम झालेला आहे. पांढरी, गावदेवी, डोंगरीदेव पूजनाचा विधी म्हणून नृत्य केले जाते. महादेव-गौरी देवतेच्या पूजनाच्या निमित्ताने गौरी नृत्य, कणसरी मातेला प्रसन्न करण्यासाठी कांबडनाच करतात श्रध्दाविधीचा भाग म्हणून काज करतात. त्यात 'वीर' म्हणविणारे भगत अंगात वारे संचारल्यासारखे शोक व्यक्त करतात. व नृत्य करतात. लग्न विधीतही वऱ्हाडी नाचतात. यावेळी देखील शिकार, मोर, साप, घोरपड, बदक, बेडुक, पाठशिवी, चारण, अस्वल, वाघ, घोडा, आदी प्रकारची नृत्य सोंगं सादर केली जातात. मादळ, तारपा, दंडार, सांबळ, उसळ्या, घुंगुरुकाढी, ढोल, तुर हे नृत्य प्रकार वेळप्रसंगी सादर केले जातात. एकूण आदिवासींचे जीवन कलाप्रकारांनी भरुन राहिलेले आहे.

'नृत्य' हा आदिवासींचे जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोकपरंपरेचा हा वारसा फार पूर्वीपासून आदिवासींनी जपत आणला आहे. नागर कलांप्रमाणे निखळ रंजन वा समाजदर्शन हे या कलांचे प्रयोजन नसते. धर्मविधी संबंध्दता हे लोककलांचे एक प्रधान वैशिष्ट्य आहे. धर्माचे सामाजिकरण करण्यात आणि गाव समाजाची एकजिनसी बांधणी करण्यात लोककलांचा महत्त्वाचा वाटा आहे.

लोकनाट्य, विधी नाट्याच्या कथाभागातून, संवादातून, वाचिक-आंगिक अभिनयातून, समाजघटकांच्या वर्तन व्यवहाराचे, चालीरीतीचे,समजुतीचे यथार्थ दर्शन घडत असते. वाढती महागाई, हौसे-गवसे-नवसे लोकांची वाढलेली संख्या आणि बदललेली मानसिकता, दारु, व्यसनाचे वाढलेले प्रमाण, गावपातळीवरील राजकारण आणि त्यातून एकमेकांत निर्माण झालेले वैर, प्रसार माध्यमांनी सूड, मारामारी, खून, महिलांची छेडछाड, लूटमार यांचे लोकमानसात रुजविलेले बीज यामुळे आदिवासी हे सर्व कलाप्रकार नृत्यप्रकार जाणून बुजून करण्याचे टाळत आहेत. यामुळे या लोककला, लोकनृत्य लोप पावण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे त्यांचा वेळीच अभ्यास होणे आवश्यक आहे.

अलीकडच्या काळात लोकसाहित्याचा सर्व अंगांनी अभ्यास होऊ लागला आहे. महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच विद्यापीठांमधून पदव्युत्तर पातळीवर 'लोकसाहित्य' हा विषय अध्ययन-अध्यापनासाठी नेमलेला आहे. त्यामुळे सर्वच विद्यापीठांमध्ये विविध दृष्टिकोनातून लोकसाहित्याचे संशोधन होऊ लागले आहे. परंतु आदिवासी लोकसाहित्याच्या बाबतीत विचार करता महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने गेल्या तीन दशकांपासून आदिवासी लोकसाहित्य संशोधनाला सुरुवात झाली असून दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत आहे. ही समाधानाची बाब असली तरी मुख्यत्वेकरुन या संशोधनाला संशोधन म्हणण्याऐवजी संकलन आणि मूल्यांकन असे दोन काठ आहेत. या काठांवर विहार करणारे अभ्यासक आदिवासी आणि आदिवासींतर वर्गांचे प्रतिनिधी आहेत. या संदर्भात देशभर पसरलेल्या आदिवासी संशोधन केंद्राचे कार्य व्यापक संदर्भ मुल्यवत्तेचे क्षितीज स्पर्शिणारे नाही असे नाईलाजाने म्हणावेसे वाटते.

लोकसाहित्याचा केंद्रबिंदू 'लोक' आहे, लोकमानस आहे, लोकसंस्कृती आहे. या सर्व घटकांचा

केवळ वरवर अंगाने विचार करुन, अभ्यास करुन चालणार नाही. तर यात खूप खोलवर जे वेदनागर्भ अटळ प्राक्तन लपलेले आहे. त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील आदिवासी लोकवस्तीचा आवाका, आदिवासी जमाती आणि लोकसाहित्याचे व्यापक क्षेत्र यामुळे आदिवासी लोकसाहित्य विषयक संशोदधाला अजूनही खूप वाव आहे.

आदिवासी संस्कृती ही पुरातन, अभिजात आणि समृध्द संस्कृती आहे. आम्हा सर्वांच्या पूर्वइतिहासातील अनेक प्रथापरंपरांचे जतन अजूनही त्यांनी केलेले आहे. आणि त्या संस्कृतीचे जतन आणि अभिव्यक्ती ही प्रामुख्याने आदिवासींचे लोकसाहित्यातून झालेली आहे. लोकगीते आणि लोककथांतून ते प्रगट होताना दिसते. मौखिक पध्दतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते हस्तांतरीत होत जाते. लोकसाहित्य लोकगीतांची निर्मिती, जडणघडण आणि लोप पावणे या तिन्ही क्रिया एकाचवेळी आणि अखंडपणे चालू असतात. आजचा जमाना हा 'रिमिक्स' चा आहे; त्यातच हिंदी आणि मराठी गाण्यांनी लोकांना आपलसं करुन घेतल आहे; पर्यायाने लोकसाहित्य-लोकगीतांकडे दुर्लक्ष होतानाचे चित्र नजरेस येऊ लागले आहे.

हल्लीचा काळ हा 'बदल आणि विकासाचा' काळ आहे. विकास कार्यक्रम आणि शिक्षणाचा प्रसार यातून आदिवासींची स्थिती झपाट्याने बदलत असून त्यांच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया वेगाने होत आहे. ही समाधानाची बाब असली तरी आज अनेक शिकलेली मुले आपल्याच आदिम बांधवांना व त्यांनी जपलेल्या संस्कृतीला विसरत चालली आहेत. कदाचित भविष्यात जुनी पिढी नामशेष झाल्यावर आदिवासी लोकसाहित्याला वारसाच उपलब्ध होणार नाही. आजच्या या जागतिकीकरण आणि शिक्षणाच्या प्रसारात लोकसंचिताचा हा सर्व मौलिक ठेवा काळाच्या उदरात गडप होण्याच्या मार्गावर आहे. या लोकसाहित्याच्या संकलनात अडचणी आहेत हे मान्य करुनही या लोकसाहित्याचे संकलन, वर्गीकरण, संपादन आणि संशोधन होणे ही आज काळाची गरज होऊन बसली आहे.

आज शिक्षण, नोकरी, व्यवसाय वा अन्य कारणांमुळे शिकलेल्या अनेक समाज घटकांना आपापल्या बोलीभाषेतून संवाद करणे आकमीपणाचे, किमान अभिजनसंगत वाटत नाही. हे प्रमाण असेच वाढत राहिले तर आदिवासी बोलीभाषेचे अस्तित्वच धोक्यात येईल. आज अनेक लहान आदिवासी जमातींच्या बोली नष्ट होण्याचे मार्गावर आहेत. पर्यायाने या बोली भाषेतील मौलिक धन नष्ट होण्याचे वाटेवर आहे. ज्यामुळे एक ऐतिहासिक साधन गमावले जाईल. ज्यामुळे सांस्कृतिक इतिहासाचा दुवाही संपुष्टात येईल. म्हणून वेळीच बोलीभाषेतील छोट्या-मोठ्या लोकसमूहातील ह्या परंपरांगत लोकसाहित्याचे संकलन, विश्लेषण व संशोधन होणे आवश्यक आहे.

आज वाड्या-पाड्यांवर, माडी-झोपडीतून प्रसारमाध्यमांनी हैदोस मांडला आहे. तो एकूणच लोक संकल्पना आणि लोकसाहित्याला मारक आहे. काळाच्या ओघात हे सर्व नामशेष होण्याच्या आधी या 'लोकसाहित्याच्या वैभवाच' संकलन, जतन आणि संशोधन करुन ठेवण्यासाठी आदिवासी लोकसाहित्याच्या अभ्यासासंबंधी व संकलनाची पिढी तयार होण्याची गरज आहे. हे कार्य आजच्या युवा संशोधकांनी हाती घेऊन खारीचा वाटा उचलायला हवा.

• • •

# दलित साहित्य चळवळ आणि समाजशास्त्रीय दृष्टीकोन

**रिना कांबळे**
(एम. फिल विद्यार्थीनी, सायबर, कोल्हापूर)

बदल हा निसर्गाचा नियम आहे. या बदलाला समाजशास्त्रीय भाषेत 'परिवर्तन' असे म्हणतात. परिवर्तन विविध माध्यमांतून होते. त्यातील एक प्रभावी माध्यम म्हणजे चळवळ. चळवळ म्हणजे सांघिक/सामुदायिकरित्या केलेली कृती. कारण चळवळ ही एक व्यक्तीची नसून समाज व समाजातील प्रत्येक घटकाची असते. समाजातील जुन्या; पण वाईट, अमानुष चालीरीती व रूढी, परंपराना विरोध दर्शविण्याकरिता गुलामी, पारतंत्र्य व कालबाह्य सामाजिक संकेत यांच्याविरूध्द संघर्ष करून नवमताचा प्रसार करण्यासाठी तसेच समाजातील एखाद्या क्षेत्रात बदल घडून आणण्यासाठी, नवीन समाजरचनेच्या निर्मितीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यासाठी औपचारिक किंवा अनौपचारिकरित्या लोकसमुदायाची जी सांघिक कृती असते त्याला चळवळ म्हणतात.

या चळवळीचे प्रगटीकरण अनेक माध्यमांद्वारे होते. त्यात प्रामुख्याने संप, मोर्चा, सभा, घोषणा, मिरवणुका, आंदोलन ही प्रत्यक्षदर्शनी माध्यमे तर लेखन हे अप्रत्यक्षदर्शनी माध्यम आहे. सामाजिक चळवळीची क्षेत्रे व्यापक असल्याने त्या त्या चळवळींना विशिष्ट अशी नांवे दिली आहेत. त्या नावानरून त्या चळवळीची उद्दिष्टे, कार्य स्पष्ट होतात. उदा. कामगार चळवळ, स्त्रियांची चळवळ, शेतकऱ्यांची चळवळ, दलित चळवळ इत्यादी.

चातुर्यवर्ण व्यवस्थेतील चौथा वर्ण म्हणजे शूद्र. शूद्र हा वरील तीन वर्गाचा सेवक, दास होता. शूद्र या वर्णातील लोकांना वेगवेगळ्या नावाने संबोधले जात होते. जसे महात्मा गांधीजींनी त्यानी ''हरिजन'' हा शब्द वापरला. भारतीय राज्यघटनेने त्यांना ''अनुसूचित जाती'' शब्द वापरला. तर १९६० मध्ये त्यांना ''दलित'' या शब्दाने संबोधित करण्यात आले. पण दलित शब्द जातीवाचक, ओंगळ शब्द वाटतो म्हणून भाऊसाहेब अडसूळ, राजा ढाले यांनी विरोध केला. त्याऐवजी ''बौध्द'' शब्द वापरण्याचा आग्रह केला; पण बाबुराव बागुल, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर यांनी ''दलित'' शब्दाचा व्यापक अर्थ स्पष्ट करून दलित शब्दाला एक नविन अस्मिता मिळवून दिली. त्यांच्या मते दलित म्हणजे ''कालाचा शोषित आणि आजचा संघर्षशील समाज होय.'' या समाजात केवळ अस्पृश्य जातीचेच लोक येतात असे नाही तर गावकुसाबाहेरील भटक्या व विमुक्त जमाती, आदिवासी, गरीब, कष्टकरी जनता ह्यांचा समावेश होता. दलित या शब्दाची व्याख्या निरनिराळ्या लोकांनी केली आहे. त्यात प्रामुख्याने,

१) ''दलित म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, बौध्द, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहिन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी होय.'' (नामदेव ढसाळ-दलित पँथर जाहिरनामा)

२) ''दलित शब्दाची व्याख्या केवळ बौध्द अथवा मागासवर्गीय नाही. तर ज्यांची ज्यांची पिळवणूक झाली असे श्रमजीवी वर्गातील ते सर्व दलित व्याख्येत येतात'' (म. ना. वानखडे, दलित विद्रोही वाङ्मय)

या दलित समाजाने आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, अपमान, मिळणारी पशुतुल्य वागणूक याचा विरोध वेगवेगळ्या मार्गांनी केला. त्यातील एक प्रभावी शस्त्र होते ते लिखाणाचे. अनेक समाजसुधारक, लेखकांनी आपल्या लिखाणातून या समाजाची खरी ओळख, त्यांना होणारा त्रास, त्याच्यावरील अन्याय, अत्याचार, लोकांपुढे कथा, कविता, लेख या माध्यमातून मांडला. त्यातूनच १९६० नंतर मराठी वाङ्मयाला एक नविन प्रवाह मिळाला, तो दलित साहित्याच्या रूपाने. दलित साहित्यामुळे मराठी वाङ्मयाच्या कक्षा व्यापक झाल्या. किसन फागू बंदसोडे ह्यांच्या कविता म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित साहित्य चळवळीतील एक पर्व होते. त्या पर्वाला खरी पहाट स्वातंत्र्योत्तर काळातील दलित साहित्याने झाली. दलित साहित्य चळवळीत श्री. किसन फागू बंदसोडे यांचे योगदान महत्त्वाचे मानले.

दलित साहित्याची व्याख्या वेगवेगळ्या लोकांनी केल्या, त्यात डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात- ''दलित साहित्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहिरनामा आहे. क्रांतिविन्मुखता आणि क्रांतिसन्मुखता यांच्या संघर्षातून निर्माण झालेले दलित साहित्य बंधमुक्त माणसांचा विचार करते.'' तर बाबूराव बागुल म्हणतात. ''दलित म्हणजे वर्ग व्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा, दलित म्हणजे जीवन वर्णव्यवस्थेशी भांडणारा, दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्यांच्यासाठी शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत, अशा दलिताच्या साहित्य निर्मितीला दलित साहित्य म्हणावे.'' थोडक्यात आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवनविषयक दृष्टिकोनाधारे स्वत:ला आणि स्वत:भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरूप अविष्कार म्हणजे दलित साहित्य होय.

दलित साहित्य हे दलित चळवळीचे साहित्य आहे असे म्हटले जाते, त्याचा अर्थ दलित साहित्य हे दलितांच्या चळवळीतून उदयाला आहे असा घ्यायचा असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या आत्मसन्मानाची चळवळ सुरू केली. समता, न्याय, बंधुत्वाचा पुरस्कार केला. त्याआड येणाऱ्या रूढी, धर्मग्रंथांना नकार दिला. हे सहज सुखासुखी घडले नाही. त्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागला. या संघर्षाचे चित्रण दलित साहित्यात अवतरले म्हणून या साहित्यात वर्णव्यवस्थेविरूद्ध संघर्ष येतो, रूढींना नकार येतो आणि समता स्वातंत्र्य व न्यायबंधुत्वाचा पुरस्कार येतो. या दलित चळवळीच्या अजूनही मागण्या पूर्ण झाल्या नाही. त्यासाठी दलित साहित्य गतिशील राहणे आवश्यक आहे. दलित साहित्य हे गतिमान चळवळीचे प्रतिबिंब असणारे साहित्य आहे. म्हणूनच काही साहित्यिकांना दलित साहित्य हे परिवर्तनाचे साधन आहे असे वाटते. चळवळ आणि चळवळीचे प्रतिबिंब असणारे दलित साहित्य त्यांचा सांधा ह्याच कारणामुळे अतूट आहे.

पण कोणतेही साहित्य चळवळीचे निर्विवाद साधन असू शकत नाही. साहित्य जाणीव समृध्द करते. चळवळीचे आकलन डोळसपणे करू शकते हे

लक्षात घेतले पाहिजे. दलित साहित्याने ''माणूस'' हेच मूल्य आहे, हे मत स्वीकारले आहे. माणसाची प्रतिष्ठा, माणसाचे स्वातंत्र्य हे दलित साहित्याची केंद्रस्थाने आहेत. म्हणून दलित साहित्य हे अस्सल भारतीय साहित्य आहे. समाज परिवर्तनासाठी दलित साहित्याची चळवळ उभी राहिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान, त्यांची चळवळ ही दलित साहित्याची प्रेरणा होती. हे साहित्य संघर्षातून जन्मलेले आहे. हा संघर्ष नव्या मूल्यव्यवस्थेसाठी, मानवी स्वातंत्र्यासाठी, सामाजिक, राजकिय, आर्थिक न्यायासाठी होता. ''जग बदल, घालुनि घाव'' असे अण्णा भाऊंनी म्हटलेले आहे. बदल हा इतिहासाचा नियम आहे. पण बदलांसाठी आधी वैचारिक क्रांती आवश्यक आहे. या वैचारिक क्रांतीसाठी दलित साहित्य कटिबद्ध आहे असे प्रा. वाघमारे म्हणतात.

दलित साहित्याचे आत्मभान, आत्मशोध हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आत्मभान म्हणजे आपण इतरांसारखे आहोत ही जाणीव, नुसते इतरांसारखे आहोत असे नव्हे तर इतरांच्या बरोबरीचे आहोत ही जाणीव महात्मा फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचारांमुळे हे आत्मभान दलित माणसाला लाभले. हे आत्मभान जागृत करण्याचे काम दलित साहित्याने केले. जसे अण्णाभाऊ साठे ह्यांची ''थडगूबुवाची गोष्ट'', माधव कोंडविलकर ह्यांची ''मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे'', प्र. ई. सोनकांबळे ह्यांची ''आठवणींचे पक्षी'', शंकरराव खरात ह्यांची ''तराळ-अंतराळ'', वैजनाथ कळसे ह्यांची ''बलुतं'', नामदेव ढसाळ ह्यांची ''जेव्हा मी जात चोरली होती'', बाबुराव बागुलांची ''विद्रोह'', ही कथा, श्री. म. माटे ह्यांची ''बन्सीधर तू कुठे रे जाशील?'' यासारख्या दलित साहित्यातून व्यक्तीचे आत्मभान जागृत झाले. हे दलित चळवळीला पूरक ठरले. आत्मभानाबरोबर नकार व विद्रोह हे दलित साहित्याची प्रकट रूपे आहेत. कारण नकार आणि विद्रोह दलितांच्या वेदनेतून जन्माला आला आहे. दलितांचा 'नकार' शोषण व्यवस्थेला, विषमतेला आहे. तर 'विद्रोह' मी माणूस आहे, मला माणसाचे सर्व हक्क मिळाले पाहिजे असाही आहे. यासंबंधी दलित साहित्यातील लिखाण म्हणजे शंकरराव खरात यांची 'एक संघर्ष' ही कथा तर 'आज इथं तर उद्या तिथं' हा कथासंग्रह, शरणकुमार लिंबाळे ह्यांची ''अक्करमाशी'' हा कविता संग्रह ''देव दानवा नरे निर्मिले, हे मत लोका कळू द्या'' असे निर्धारपूर्वक सांगणाच्या केशवसुतांच्या कविता दया पवार ह्यांची ''हे महाकवे'' ही कविता ''आज आम्ही गद्दार झालोय'' ही अरूण कांबळे यांची कविता या सर्व साहित्यामुळे मानवी समाज ढवळू लागला.

नकार, विद्रोह, चिड, आत्मभान हे दलित साहित्याचे फक्त स्वरूप होते असे नाही तर आत्मविश्वास, नवीन आशावाद हे देखील दलितं साहित्यातून पहायला मिळते हा आशावाद दलित चळवळीला प्रेरणादायी ठरला. या आशावादी साहित्यामध्ये नारायण सुर्वे यांच्या कविता नामदेव ढसाळ यांची ''माणसाने पाहिला प्रथम स्वत:ला'' ही कविता, भि. शि. शिंदे ह्यांचे ''काळोखाच्या गर्भात'' हे नाटक, प्रा. अविनाश डोळस यांची ''बळी'' ही कथा, वामन होवाळांची ''मजल्याची घंर'' ही कथा, केशव मेश्राम ह्यांची ''पाखरांनो'' ही कविता, प्रा. फ. मु. शिंदे ह्यांची ''निळ्या पहाडाच्या कविता'', रा. ग. जाधव ह्यांची ''निळी पहाट'' कविता. अशा आशावादी दलित साहित्यातून आशेचा एक नवा किरण दलित चळवळीला मिळाला.

१९६० साली निघालेल्या ''अथर्व'' ह्या लघुनियतकालिकापासून ह्या दलित साहित्य

चळवळीला खरी सुरूवात झाली. १९७० पर्यंत ही चळवळ सुरू राहिली. दलित साहित्य चळवळीला प्रेरणा देणारी घटना म्हणजे धर्मपरिवर्तन. ही घटना १९६९ नंतर दलित साहित्य चळवळ अधिक गतिशील होऊ लागलेली दिसते. जसे नामदेव ढसाळ ह्यांचा ''गोलपीठा'' (१९७२), ''मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले'' (१९७५), ''तुही इयत्ता कंची ही'' (१९८१), ''खेळ'' (१९८३) अशा कविता संग्रहातून हिंदू समाज व्यवस्थेतील शूद्र वर्णाचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक पातळीवरील शोषण पहायला मिळते. दलित जाणिवेचा अविष्कार करणारे महत्त्वाचे कवी म्हणजे ह्या पवार (कोंडवाडा), वामन निंबाळकर (गावकुसा बाहेरील कविता, महायुध्द), यशवंत मनोहर (अत्थनगंफा, मुर्तिभंजन) ह्या कविता, १९६० नंतर दलित कवितेत उपेक्षित, बहिष्कृत, पिडीत, शोषीत समाजाची वेदना, विद्रोह अधिक प्रकट झालेले दिसते.

दलित जाणिवांचा अविष्कार करणाऱ्या काही कादंबऱ्या १९६० मध्ये लिहिल्या गेल्या त्यात बाबुराव बागुल यांची ''सूड'' (१९७०), केशव मेश्राम यांची ''हकिकत'' आणि ''जटायू'' (१९७२), नामदेव ढसाळ ''हाडकी हाडवळा'' (१९८२), अशोक व्हटकर ''मेलेलं प्राणी'' (१९८२), अरूण साधू ''बहिष्कृत'' (१९७८) आणि ''त्रिशंकू'' (१९७९), मधु मंगेश कर्णिक ''भाकरी आणि फूल'' इत्यादी उल्लेखनीय कादंबऱ्या आहेत. अनेक दलित लेखकांनी आत्मकथन अतिशय समर्थपणे लिहिले यात ''बलुतं'' ह्या पवार, ''आठवणींचे पक्षी'' प्र. ई. सोनकांबळे, ''उपरा'' लक्ष्मण माने, ''उचल्या'' लक्ष्मण गायकवाड, ''काट्यावरची पोटं'' उत्तम बंडू तुपे, ''कोल्हाट्याचं पोर'' किशोर शांताबाई कांबळे, ''बिराड'' अशोक पवार ह्या सर्वांचे आत्मकथनातून दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा यांना बळी पडलेल्यांची चरित्रे येतात. तसेच जातीय पातळीवरील विषमतेने बहुतेकांची आयुष्ये दुःखपूर्ण कशी केली. समाज परिवर्तनाशिवाय येथील माणूस मुक्त होऊ शकत नाही. त्यांना माणसासारखी वागणुक मिळणे अशक्य आहे. असे ह्या दाहक आत्मकथनांच्या वाचनानंतर वाटते.

१९६० नंतरच्या दलित आत्मकथा, कथा, कविता, कादंबऱ्या, लघुनियतकालिका, नाटके या साहित्याने समाजात जागृती होत असल्याचे चिन्ह मानले जाऊ लागले. दलित साहित्यामुळे दलित लेखकांनी आपल्या संघटना स्थापन केल्या. यात दलित साहित्य संसद, दलित साहित्य महासभा, पुरोगामी विचारमंच, परिवर्तन साहित्य महामंडळ अशा दलित लेखकांच्या संस्था, संघटना अस्तित्वात आल्या. दलित साहित्य संमेलने, बौध्द साहित्य संमेलने, दलित साहित्य चळवळ गतिमान केली. नियतकालिके, दैनिके, साप्ताहिके, मासिके, पुस्तक प्रकाशने, परिसंवाद, व्याख्याने या उपक्रमातून आणि कार्यक्रमातून दलित साहित्य चळवळीचा १९६० ते १९७० च्या दशकात अधिक विकास झालेला पहायला मिळतो.

दलित साहित्याकडे प्रारंभी मराठी समीक्षेने दुर्लक्ष केले. अर्वाच्य, ग्राम्य, अश्लील, आक्रस्ताळी, एकसुरी, इत्यादी विशेषणे दलित साहित्याला बहाल केली. तरी देखील दलित वाङ्मयाची निर्मिती आणि चळवळ सुरूच राहिली. बाबुराव बागुल, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ इत्यादी कवींनी, लेखकांना वर्गव्यवस्थेविरूद्ध, आर्थिक पिळवणुकीविरूद्ध सर्वकाळ समता प्रस्थापित करण्यासाठी बंडखोरी चळवळ हवी असे वाटते आणि त्यांची दलित साहित्य

***(पृष्ठ क्र. ४८ वर पहा)***

# आदिवासी युगुलांचा प्रिय भोगऱ्या बाजार

*अजय पालीवाल (मुक्त पत्रकार)*

महाराष्ट्रातील उत्तर भागात असलेल्या धुळे, नंदुरबार, आणि जळगाव जिल्ह्यात खानदेश हा विभाग. याच खानदेशात विशेषत: जळगाव जिल्ह्याच्या उत्तरेस असलेला सातपुडा पर्वत म्हणजे महाराष्ट्रातील आणि मध्य प्रदेशातील नैसर्गिक सीमारेषा आहे. या सातपुड्यात मुख्यत: आदिवासी जमातीची लोकवस्ती आहे. पावरा, बोरेला, पारधी, पाडवी जमाती प्रामुख्याने वर्षांनुवर्षे या भागात राहतात. नैसर्गिक साधनसंपत्तीने नटलेल्या सातपुड्यात अनेक वर्षांपासून स्वभावत: शांत, प्रामाणिक नि काटक असलेल्या आदिवासींची वस्ती आहे. जळगाव जिल्ह्यातील चोपडा, यावल, रावेर तालुक्यातील सातपुड्याच्या पर्वतरांगेत हा समाज विखुरलेला आहे.

सातपुड्याच्या पर्वतरांगेतील त्या १६ गावांमधील वैजापूर हे मोठे आणि मध्यवर्ती गाव. सुमारे १००० लोकवस्तीच्या या गावात प्रत्येक शनिवारी आठवडी बाजार भरत असतो. वर्षभरातील या आठवडी बाजारात आदिवासी आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी आवश्यक वस्तू खरेदी करत असतात. परंतु याच वैजापूर गावात होळीच्या पार्श्वभूमीवर भरणारा शनिवारचा बाजार हा खूपच वैशिष्ट्यपूर्ण असतो. या बाजाराला पंचक्रोशीतील लोक 'भोगऱ्या बाजार' या नावाने ओळखतात. नाच, गाणे प्रिय असलेल्या आदिवासी समाजाला या बाजाराची वर्षभर प्रतीक्षा असते. होळीच्या सुमारे एक महिना अगोदरपासून सातपुड्यातील आदिवासींना लगबग लागते ती भोगऱ्या बाजाराला जाण्याची. सातपुड्यातील आदिवासींच्या जीवनातील महत्त्वाच्या आणि प्रिय अशा भोगऱ्या सणाची सुरुवात या बाजारापासूनच होते. होळी सणासाठी लागणारे सामान तसेच किराणा सामान, भोगऱ्या सणासाठीची कापड खरेदी तसेच लग्नसोयरीक जुळवण्यासाठी लागणारे कापड, दागदागिने यांचीसुद्धा खरेदी याच बाजारातून केली जाते.

आदिवासी समाजात मुलींना मानाचे स्थान आहे. या समाजात मुलींना हुंडा देण्याची प्रथा आहे. होळीच्या अगोदर एक महिन्यापासून ते आपल्या उपवर मुलामुलींची लग्नसोयरीक जुळविण्यासाठी या सणाची व या बाजाराची आतुरतेने वाट पाहत असतो. कारण याच भोगऱ्या बाजारात उपवर मुले-मुली एकमेकांना बघून आपल्या भावी आयुष्याच्या जोडीदाराची निवड करत असतात. वैजापूर हे गाव महाराष्ट्रातील उत्तर सीमेवरील शेवटचे गाव. या गावातून वाहणारी अनेर नदी ही महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशची नैसर्गिक सीमारेषा आहे. शनिवारी येणारा भोगऱ्या बाजार हा या नदीकाठी भरवला जातो.

वैजापूर गावात भरणाऱ्या या भोगऱ्या बाजारात महाराष्ट्रातील तसेच सीमेपलीकडील अनेक खेड्यापाड्यांतून हजारो आदिवासी येत असतात. एरव्ही नेहमीच्या आठवडी बाजारात हे आदिवासी मिळेल त्या वाहनाने येत असतात. परंतु होळीच्या

पार्श्वभूमीवर भरणाऱ्या भोगऱ्या बाजारासाठी मात्र आपल्या स्वत:च्या सजवलेल्या बैलगाडीत कुटुंबासहित येणे जास्त पसंत करतात. त्यासाठी बैलांना सजवून त्यांच्या शिंगांना रंग, फुगे, फुलांच्या माळा लावून, त्यांच्या अंगावर रंगीबेरंगी झुली चढविण्यात येतात. बैलांच्या गळ्यात घुंगरांच्या माळा घालून, त्यांना सजावट केलेल्या बैलगाडीला जुंपून, अनेक मैलांचा प्रवास करीत आदिवासी बांधव आपल्या संपूर्ण कुटुंबासह भोगऱ्या बाजारात येतात.

पारंपरिक वेशभूषेत आलेले अनेक आदिवासी तरुण-तरुणी याच बाजारात आपल्या भावी जोडीदाराचा शोधही घेत असतात. एखाद्या तरुणास मुलगी पसंत असल्यास तो तिला त्याबद्दल विचारतो. नंतर याच बाजारातून हे युगल एकमेकांच्या संगनमताने पळून जाऊन आपल्या जवळच्या नातेवाईकांकडे निवाऱ्यास जातात. तेथूनच मुला-मुलींच्या घरी विवाहासंबंधी बोलणी करण्याचा निरोप पाठवला जातो आणि काही दिवसांत दोन्हीकडील पाल जातपंचायतीच्या पंचासमक्ष त्यांच्या विवाहास मान्यता देतात. तेथेच पंचासमक्ष मुलीच्या वडीलांना हुंडा देऊन विवाह निश्चित करण्यात येतो.

काळ बदलला असला तरीही सातपुड्यातील आदिवासींच्या जीवनात या पारंपरिक भोगऱ्या बाजाराचे महत्त्व कायम आहे. या भोगऱ्या बाजारातून हा आदिवासी समाज आपला विवाह जुळविण्याची ही अनोखी परंपरा आजही जपत आहे. भोगऱ्या बाजारात येणाऱ्यांचे स्वागत दारु तसेच बिडी देऊन केले जाते. होळीच्या पार्श्वभूमीवर भरणाऱ्या वैजापूरच्या या भोगऱ्या बाजारास जत्रेचे स्वरूप प्राप्त झालेले असते. अनेक गावांतून आलेली आदिवासी कुटुंबे या जत्रेचा आनंद लुटत असतात. उंच उंच आकाशाला भिडणारे पाळणे, गोलगोल फिरणारे झोपाळे या बाजारात लहान-मोठ्यांचे मनोरंजन करीत असतात. अनेक पारंपरिक खेळ आणि कुस्त्यांचे आयोजन भोगऱ्या बाजाराच्या निमित्ताने केले जाते. आदिवासी महिलांसाठी 'कावल्या' आणि 'धोती' (आदिवासी स्त्रियांचा पेहराव) ची अनेक दुकाने या बाजारात लावलेली असतात. खरेदीचा शीण घालवण्यासाठी भोगऱ्या बाजाराच्या मध्यभागी वाजत असलेल्या ढोल आणि थाटी (पितळी ताट)च्या तालावर हे आदिवासी ताल धरतात. स्त्री-पुरुष असा कुठलाही भेदभाव यात केला जात नाही. शेतीसाठी लागणारी अवजारे, घरगुती वापरास लागणारी भांडी, किराणा सामान, कापड, दागदागिने, अशी अनेक दुकाने या बाजारात थाटलेली असतात. चुरमुरे, डाळ्या आणि शेव अशी खास आदिवासींच्या न्याहारीला लागणारी 'मिरी भोजऱ्या'ची अनेक दुकाने येथे असतात. खास खानदेश गुळाची जिलेबी आणि कांदा-मिरची भजी हे या भोगऱ्या बाजाराचे विशेष आकर्षण असते. सकाळपासून सुरु झालेला हा बाजार सायंकाळी पाचनंतर ओसरायला लागतो. तरीही आदिवासींमधला उत्साह कमी झालेला नसतो. ढोलाच्या तालावर नाचत नाचत आपल्या पारंपरिक पद्धतीने सजविलेल्या बैलगाडीतून आपल्या कुटुंबासह भोगऱ्या सणाचा उत्साह आणि आनंद चेहऱ्यावर घेऊन ते घराकडे वाट धरतात...

• • •

# वाघोडे आदिवासीवाडीवरील एक सकाळ

**नवीन सोष्टे**

अलिबाग-पेण मार्गावरील पेझारी गावापासून नागोठाण्याकडे येत असताना निसर्गरम्य बांधण गावाच्या फाट्यावरून दक्षिणेकडे तीन कि.मि.अंतरावर १४ वर्षापूर्वी ५० कौलारू, पक्क्या घरकुलांची एक आदर्श आदिवासी वसाहत म्हणून प्रेक्षणीय ठरलेली ही चंदरवाडी-आदिवासीवाडी.

याच चंदरवाडीकडे चालत जात असताना या आदिवासी वाडीतील शाळेवर त्यावेळी शिक्षक म्हणून काम करीत असलेले आमचे साहित्यिक मित्र म. ना. पाटील दूरवर बोट दाखवित मला म्हणाले, दर्यासारंग कान्होजी आंग्रे यांच्या आरमारी पराक्रमाची साक्ष देत असलेला समोरचा तो सागरगड पहा. याच गडाच्या रमणीय कुशीत वाघोडे गावाजवळ ही चंदरवाडी आहे. म. ना. पाटील बोलत होते; परंतु त्यावेळी दुपारचे अडीच वाजले होते. प्रवास पायी असल्याने आणि डोक्यावर ऊन असल्याने एकीकडे पोटात कावळे ओरडत होते. त्यामुळे रमणीय आणि निसर्ग या शब्दांकडे माझे लक्ष नव्हते. त्यामुळे मी त्यांना म्हणालो, 'अजून किती चालायचे आहे?' यावर ते म्हणाले, आपण चंदरवाडीच्या टप्प्यात आलो आहोत, अर्थात वस्तुस्थिती खरी होती. पूर्वेला आम्रवृक्ष व त्यांच्या सावळया आणि करवंदाच्या जाळया मागे टाकत आम्ही चंदरवाडीच्या टप्प्यात आलो होतो. सागरगडाच्या पलिकडे असलेल्या अलिबाग व रेवदंडाच्या समुद्रावरून भर उन्हातही येणारा सागरी वारा आमचे मन ऊल्हासित करून जात होता. सोबत ॲड. उदय अधिकारी होते. बोलत असताना म. ना. पाटील म्हणाले, बारा वर्षांपूर्वी चंदर नाईक या दिवंगत आदिवासी कार्यकर्त्यांचे या वसाहतीला नाव देऊन त्यावेळचे रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष स्वर्गीय प्रभाकर पाटील यांनी एक चांगले औचित्य साधले.

मोठमोठया लोकांची नावे देण्याची नेहमीची परंपरा मोडून येथल्याच मातीत जन्मलेल्या, इमान राखून काम करणाऱ्या एका आदिवासी कार्यकर्त्याची स्मृती कायम राखावी हा हेतू प्रभाकर पाटील यांचा होता. म. ना. पाटील पुढे म्हणाले की, ही वाडी उभी राहण्यापूर्वी येथे होत्या फक्त कारवींच्या झोपडया. प्रभाकर पाटील रायगढ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना त्यांच्यातील जागृत पत्रकाराने चंदरवाडीसाठी कलात्मक अशी शब्दरचना केली ही या वाडीची वैशिष्ट्ये होती. प्रत्येक घरकुलातील कुटुंब प्रमुखाचा नावाचा ऊल्लेख होईल, अशी शब्दरचना त्यावेळी मन मोहून टाकत होती. येथील वृक्षांना व्यास, वाल्मिकी, वसिष्टदी या मुनींची नावे देउन प्रभाकर पाटील यांनी महाभारताचे सारे चित्रण या वाडीच्या निमित्ताने प्रत्यक्षात साकारले होते. एका ठिकाणी जुळया झाडांना लव-कुश असे नाव देऊन वाडी पाहणाऱ्यांसमोर रामायण काळातील निसर्ग उभा केला होता. एवढेच नव्हे तर या वाडीवरील मुलांवर

संस्कार करून त्यांच्यामध्ये वैचारिक परिवर्तन घडवून फार मोठी जबाबदारी त्यावेळी प्रभाकर पाटील यांना तेथील शिक्षकांवर व कार्यकर्त्यांवर सोपविली होती. त्यावेळी तेथील विद्यार्थी संस्कृत भाषेतील गणेश स्तवन व ज्ञानेश्वरी तोंडपाठ आणि सुरेख आवाजात आलेल्या पाहुण्यांसमोर म्हणून दाखवित होती. यावेळी महाराष्ट्रातील पत्रकार, पंचायत समिती, समाजकल्याण सचिव, स्थानिक मान्यवरांनी या वाडीला भेट देवून तेथील कार्यकर्त्यांचे कौतुक करून निष्ठावंत कार्यकर्त्यांचा ताफा असेल तर आदिवासी पुढे जाऊ शकतो, असे गौरव उदगारदेखील काढले होते.

१९८४ साली दै. नवशक्तीने देखील या वाडीवर लेख प्रसिध्द करून ही वाडी महाराष्ट्रासमोर आणली होती. म. ना. पाटील मला हे सर्व सांगत होते. परंतु मी मात्र एका वेगळया मूडमध्ये होतो. मी चौदा वर्षे मागे जात होतो. त्यावेळी नुकताच मी पत्रकारितेत स्थिरावलो होतो आणि एक पत्रकार म्हणून या वाडीला मीही त्यावेळी भेट दिली होती. याची जाणीव मला त्यावेळी झाली. परंतु आज मी उभा होतो ते चित्र आणि आजचे चित्र यात बराचसा फरक आहे. शासनाच्या विविध योजना आदिवासींसाठी असू शकतात; परंतु शसनाच्या त्या त्या खात्यांनी सातत्य ठेवले नाही तर एका चांगल्या योजनेचे तीन-तेरा कसे वाजतात हे मी चंदरवाडीच्या रूपाने फार जवळून पाहत होते. त्यावेळी आदिवासींसाठी बांधलेला तलाव देखील कोरडा ठणठणीत होता. शासनकर्त्यांना दोष देत होता.

म. ना. पाटलांच्या मनातील चंदरवाडी आणि माझ्या मनातील त्यावेळची चंदरवाडी तेथे दिसत नव्हती. तर तेथे दिसत होते शासनकर्त्यांनी आपल्या अधिकारी वर्गावर केलेले संस्कार, केवळ नोकरीच्या नावाखाली टोपल्या टाकणारे सरकारी अधिकारी. हाच या आदिवासी वाडीचा शेवटचा शाप ठरला.

टक्के

सवलत कागदोपत्री असली तरी प्रत्यक्षात ती सवलत ७ टक्केच दिली जाते, असे या मेळाव्यात आदिवासी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र गावीत यांनी

सांगितले. केंद्र सरकार आदिवासींसाठी जी मदत पाठविते त्याचा ७० ते ७५ टक्के निधी न वापरता परत जातो.याचा अर्थ आदिवासींना आदिवासीच ठेवायचे का ? असा त्यांचा सवाल होता.

हे सर्व येथे नमूद करण्याचे कारण म्हणजे काही वर्षापूर्वी महाराष्ट्र शासनाने सर्वांना अर्थिक व सामाजिक न्याय अशा आशयाची एक जाहिरात आपले उद्दिष्ट या शीर्षकाखाली प्रसिध्द केली होती.

'राज्याचा सर्वांगिण आर्थिक विकास करणे व जनतेला सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देणे हे आमचे ध्येय आहे. भूमीहीन, शेतमजूर आणि अनुसूचित जाती-जमाती यासारख्या आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्यांचे स्वावलंबन व्हावे हेच आमचे उद्दिष्ट आहे,' असा आशय या जाहिरातीचा होता. या जाहिरातीचा उल्लेख येथे करण्याचे कारण म्हणजे याच काळात प्रभाकर पाटील हे रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. शासन आपल्या हातात असल्यावर माहिती खात्याच्या कल्पकतेवर तळागाळातल्या समाजाची अश्रू पुसणारी कितीतरी रंगीबेरंगी पत्रके जाहिरातीच्या रूपाने आपण आजही पाहात आलो आहोत. परंतु त्यावेळी राज्यात काँग्रेस व रायगड जिल्हयात जिल्हा परिषद शेतकरी कामगार पक्षाकडे; अशा अवस्थेत राज्य सरकारची साथ नसतानाही कर्तृत्वावर व सामाजिक कळकळ यांच्या जोरावर ही सारी स्वप्ने आदर्श चंदरवाडी-वाघोडेच्या रूपाने प्रत्यक्षात साकार करणारे एक व्यक्तिमत्व प्रभाकर पाटील यांच्या रूपाने १९८४ साली प्रत्यक्ष जवळून पाहण्याची संधी मला मिळाली.

१४ वर्षे मी मागे जातो तेव्हा माझ्यासमोर ती चंदर आदिवासी वाडी समोर येते. अविकसित भागांच्या प्रगतीचा आढावा घेताना शासनाची अनेक रंगीबेरंगी पत्रके पहावयास मिळतात. आमचे शासन आदिवासींसाठी अनेक योजना राबविते; परंतु या योजनेचा पाठपुरावा न केल्याने योजनाच तशा अविकसित राहतात, याचे प्रत्यंतर सध्या रायगड जिल्हयात दिसून येते. आदिवासी आणि त्यांची दुःखे हा विषय एखाद्या मंत्र्याला भाषणाला चांगला असला, तरी या देशातील दारिद्र्याचे भांडवल खुद्द आदिवासींव्दारे जेव्हा चव्हाटयावर मांडले जाते तेव्हा फक्त जन्म देवून विश्वामित्रासारखी पालनपोषणची जबाबदारी आम्ही झटकून टाकतो, तेव्हा वाल्याचा मंत्री झाला व नवा इतिहास आपणच निर्माण करीत आहोत याचे भान आम्हाला राहत नाही.

गेल्या पाच वर्षात शासनाने या जिल्ह्यात अनेक कातकरी वाड्यांचे स्वरूप बदलले, कुडांची घरे जाऊन तेथे कौलारु घरे आली; परंतु आतल्या माणसाला बदलविणे काही शासनकर्त्यांना जमलेले नाही. याचा परिणाम हाच झाला की, दारु आणि चार घासासाठी झोपड्यांवरील कौलाचा व्यापार झाला. घरांच्या लाकडी चौकटी रातोरात निखळल्या गेल्या आणि आदिवासी हा आदिवासीच राहिला. निवाऱ्याबरोबर स्वावलंबनाचे महत्व पटवून सांगितले नसल्याचा हा परिणाम शासन आदिवासींना बकऱ्या व कोंबड्या स्वावलंबनासाठी देते; परंतु एक बकरीच्या अनेक बकऱ्या कशा

होतील, याचे ज्ञान मात्र त्यांना देत नाही. काही आदिवासींना मिळालेल्या बकऱ्या त्यांच्या घरीच गेल्या नाहीत, अशी उदाहरणे या जिल्ह्यात आहेत. नाव आदिवासींचे आणि बकऱ्या मात्र पुढाऱ्यांच्या घरी. खोटे बोललात तर चोरीच्या भानगडीत अडकविन असा वर दम मिळत असल्याने 'मुकी बिचारी कुणीही हाका' अशी त्यांची परिस्थिती आहे.

पण कधी कधी वाळवंटातही हिरवळ दिसली की मनाला दिलासा मिळतो. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे याच वाघोडे आदिवासी चंदरवाडीत १४ वर्षांपूर्वी गेलो होतो. तेथे निवाऱ्याबरोबरच स्वावलंबनाचे महत्त्व आदिवासींना सांगितले जात होते. आदिवासी उपाय योजना आणि रायगड जिल्हा परिषद, समाजकल्याण विभाग यांचा यशस्वी प्रयोग म्हणून या वाडीचा उल्लेख आजही करावयास पाहिजे. प्रत्येकी सुमारे ७५००/- रुपये खर्च करून येथे ५० घरकुले त्यावेळी आदिवासींच्या ताब्यात दिली होती. वाघोडे ग्रामस्थांनी गावाच्या जवळील अडीच एकर जागा या योजनेसाठी त्यावेळी दिली होती. अर्थात घरकुलाबरोबरच माणसे म्हणून जगा हे जीवनसूत्रही येथे त्यांना योजनेद्वारे पटवून दिल्याने 'घर नविन पण आत उपासमार' अशी परिस्थिती येथे त्यावेळी नव्हती. आदिवासींसाठी घरे बांधली; परंतु ती कशी स्वच्छ ठेवावी ? रोगराई येऊ नये यासाठी भोवतालचा परिसर व स्वत:चे आरोग्य उत्तम कसे ठेवावे या शिकवणीचे धडे येथे दिले जात होते. ज. रा. पाटील, म. ना. पाटील व वाघोडे गावातील ग्रामस्थ हे रात्रंदिवस या चंदरवाडीत राबत होते. आंघोळीपासून कपडे कसे धुवावे, एवढेच नव्हे तर केसांची, दातांची निगा कशी राखावी याचे मार्गदर्शन या मंडळाने सातत्याने केले.

या वाडीत साजरा झालेल्या पत्रकार दिनानिमित्त जिल्ह्यातील पत्रकारांनी या वाडीस भेट दिली असता त्यांनी या व्यवस्थेबद्दल उपस्थित ग्रामस्थांचा, कार्यकर्त्यांचा व हे सर्व ज्यांनी घडवून आणले त्या प्रभाकर पाटलांचा त्यावेळी गौरव केला होता. कारण आदिवासीवाडी म्हणजे फाटलेला कुड आणि दारु हे समीकरण येथे पहावयास मिळेल अशी अपेक्षा माझ्यासह सर्व पत्रकारांची होती. पण येथे ती अपेक्षा फोल ठरली.

येथे त्यावेळी प्रत्येक आदिवासीला नऊ बकऱ्या, एक बोकड, तसेच कोंबड्या दिल्या होत्या. काही वेळेला कोंबड्या किंवा बकऱ्या दिल्या जातात; परंतु त्यांची निगा राखली जात नसल्याने रोगराईत बकऱ्या बळी जाण्याचा धोका असतो. येथे त्यावेळी आदिवासींच्या बकऱ्या व कोंबड्यांसाठी एका पशु वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते. दररोज कोंबड्या व बकऱ्या यांची पाहाणी केली जात असे, त्यामुळे रोगमुक्त बकऱ्यांपासून झालेल्या अनेक बकऱ्या येथे पाहावयास मिळाल्या. कामाशिवाय बकरी व कोंबडी विकायची नाही अशी शिकवण येथे मिळत होती. घरातील भांडी विकून कोंबड्या आणि दारुंवर पैसे उधळणे ही या आदिवासींची परंपरा; परंतु या आदिवासीवाडीतील नथुराम काळू नाईक याने कोंबड्या विकून जेव्हा भांडी विकत आणली तेव्हा

***(पृष्ठ क्र. ४६ वर पहा)***

# {e]H$m§Mr gm'm{OH$ ~m§{YbH$s

**महेंद्रकुमार आ. जाधव**

(सदरचा लेख केवळ एखाद्या विशिष्ट समाजासाठी नसून एकंदरीतच शिक्षण व्यवस्थेविषयी हे भाष्य आहे. त्यामुळे ते सर्वच थरातील व्यवस्थेला लागू पडते.)

फार प्राचीन काळापासून शिक्षण देणे आणि शिक्षण घेणे ही संकल्पना रूढ झाली आहे. शिक्षणाचे महत्त्व पटल्यामुळे किंवा शिक्षणामुळे होणारा फायदा आणि विकास लक्षात घेता समाजाचा विकास करावयाचा झाल्यास व्यक्ती विकास झाल्याशिवाय समाज विकास किंवा देश विकास, प्रगती तसेच वैभव संपन्न देश होऊ शकत नाही. म्हणून बुध्दीकौशल्याने शिक्षण घेणारे आणि देणारे फारच थोडे असतात.

पूर्वी प्राथमिक शिक्षण ६ ते ११ वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये समाजावलेले होते. त्यावेळी शिक्षण देणारे प्राथमिक स्तरावर शिक्षकांना गुरू, गुरुजी, मास्तर अशा नावाने ओळखले जात होते. शिवाय फक्त विद्यार्थी शिष्यांनाच दिले जात होते असे नव्हते. गुरुजी हे समाजाच्या सर्व कार्यात पुढे असायचे. त्यांच्या शिवाय पान हालत नव्हते. इतके ते समाजात समरस झालेले होते.

पुढे प्राथमिक स्तर संपल्यानंतर पुढील शिक्षण हायस्कूलमध्ये दिले गेले. तेथे 'गुरुजी' ऐवजी इंग्रजीमधून शिक्षकांना 'सर' म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यावेळी विद्यार्थ्यांचे वय १२ ते १५ असायचे. ~~मात्र ते शिक्षक~~ ठराविक ठरवून दिलेल्या समाजात समाविष्ट झालेले नव्हते. त्यामुळे समाज आणि हायस्कूल शिक्षक यांचा घनिष्ठ संबंध आलेला नाही. त्यामुळे समाज विकास किंवा देश विकास होऊ शकला नाही. हे लक्षात आल्यानंतर थोडीफार अभ्यासक्रमात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न झाला.

पुढे मात्र ११ वी नंतरचे शिक्षण सुरू झाले. त्याला कॉलेजचे शिक्षण या नात्याने ओळखले जाऊ लागले. त्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा वयोगट १८ वर्षांवरील असलेने संसाराच्या उंबरठ्यावरचे पोक्त स्वरूपाचे असल्याने तो विद्यार्थी समाजातील प्रापंचिक अवस्थेतील प्राथमिक घटक म्हणून ओळखला जात असे. या घटकातील विद्यार्थ्यांना कॉलेज मधील शिक्षण म्हणजे उच्च शिक्षण समजले जाऊ लागले. या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या गुरूजनांना प्राध्यापक म्हणू लागले.

हा कॉलेजचा विद्यार्थी म्हणजे समाजातील पहिली पायरी आहे हे ओळखून निव्वळ कॉलेजच्या अभ्यासक्रमाशिवाय सामाजिक विकास साधण्यासाठी अनेक उपक्रमाने समाविष्ट असलेला अभ्यासक्रम असावा म्हणून शिक्षण पध्दतीत थोडा बदल करून नवी शिक्षण पध्दत सुरू झाली. त्यानुसार समाज घडला जाऊ लागला. पण समाज विकासाच्या विविध मार्गाने विकास झाला पाहिजे. तो अद्यापही झाला नाही, हे दिसून आल्यानंतर गुरुजनांनी विशेषत: प्राध्यापकांना आजच्या या २१ व्या शतकात म्हणजे

देश विकासाच्या स्पर्धेच्या चढाओढीत त्या देशाला प्रगतीकडे न्यावयास कारणीभूत होतात. या स्पर्धेच्या युगात समाज टिकला पाहिजे, त्यासाठीचा अभ्यासक्रम समाज आणि प्राध्यापक यांचा एकनिष्ठ संबंध आला तर देश प्रगतीपथाची वाटचाल करण्यास सोपे जाईल, असे म्हणता येईल.

आजची अवस्था काय ? याचा सातत्याने विचार केला तर समाजामध्ये निव्वळ प्राध्यापक म्हणून कसे संबंध आहेत याचे संशोधन करण्याची वेळ आलेली आहे. आजचा प्राध्यापक आणि समाज यामध्ये जे अंतर आहे, ते कमी करुन देश विकास साधण्यासाठी किंवा स्पर्धेच्या युगात टिकवण्यासाठीचा 'अभ्यासक्रम' तयार केला पाहिजे. आजचा प्राध्यापक विद्यार्थी केंद्रित आहे. त्यांनी आपल्या समाजाकडे फावल्यावेळी तरी लक्ष दिले आहे काय ? हे पाहिल्यानंतर समाज आणि प्राध्यापक यांची जडणघडण झाली पाहिजे असे निश्चितपणे वाटते.

प्राध्यापकांना समाज सेवा करण्यास किंवा समाजास प्रबोधन करण्यास खूप वेळ आहे. याचे मर्म फक्त प्राध्यापक जाणू शकतो. कारण तो समाजाकडे संशोधनात्मक दृष्टीने पहात असतो. प्राध्यापकाची संशोधनवृत्ती खूपच वाढलेली असते. हे साध्य करण्यासाठी प्राध्यापकांनी प्रथम आपल्या 'कुटुंबा' पासून सुरुवात केली पाहिजे. 'कुटुंब' हा एक समाजाचा महत्त्वाचा घटक आहे, तो प्रथम सुधारला पाहिजे म्हणजे समाज सुधारण्यास कालावधी लागणार नाही. समाज हा अनेक व्यक्ती आणि कुटुंब मिळून बनलेला असतो. समाजाच्या मूलभूत गरजा कोणत्या, त्याचे कशाप्रकारे निवारण करावे, याचे भान ठेवून समाज सुधारणा प्राध्यापकांनी आजच्या युगात केली पाहिजे, असे वाटते. तो अजून समाजात मिसळलेला नाही. तो स्वत:स 'देवदूत' समजतो, हे खेदाने म्हणावे लागते. तो संशोधक व शहाणपणाचा सर्व अधिकार स्वत:तच आहे असे समजतो. कारण प्राध्यापकापेक्षा वरिष्ठ कोणी असू शकत नाही हे साफ खोटे नाही. तेव्हा समाज आणि प्राध्यापक यांच्यात कमालीची फारकत किंवा अंतर आहे.

प्राध्यापक हा आदर्श कुटुंब बनविणारा समाजामधला समाज सुधारक शिल्पकार असतो. समाजातील इतर कुटुंबांना मार्गदर्शक म्हणून तो ओळखला जातो. त्यासाठी समाजात त्याने मिळून-मिसळून वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज समाजाची फार मोठी वेगळी आणि निराळी धारणा झालेली आहे. ती खरी का खोटी हा भाग वेगळा. पण प्राध्यापकांना पगार भरपूर आणि त्या मानाने काम कमी अशा समजुतीत समाजाची जडण-घडण होत आहे. ते कमी करण्याचा प्राध्यापकांच्याकडून सातत्याने प्रयत्न झाला पाहिजे. त्या ठिकाणी आजचा प्राध्यापक कमी पडत आहे असे वाटते. याचे कारण निश्चित सांगता येणार नाही किंवा नसेल तर किमान समाज अज्ञानपणाने वक्तव्ये करीत असेल तर त्याचे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे, नाही तर याचा परिणाम जे शिक्षण द्यावयाचे त्यावर आणि शिक्षणाचा वापर करून केलेल्या संशोधनावरसुद्धा होईल. शिक्षण, संशोधन आणि त्यातून विकास ही 'त्रिसूत्री' सर्व जगाने मान्य केली आहे. या सूत्राचा जो देश वापर करतो, त्या देशाची प्रगती झपाट्याने होत असते. शिक्षण नेहमी

परिस्थितीनुसार बदलत असते. समाजाला ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्यानुसार शिक्षण देण्याची उपाययोजना असावी. समाजाचा विकास एकांगी होत नसून त्याचा अभ्यास प्राध्यापक मंडळींनी सातत्याने केला पाहिजे.

आजच्या शिक्षणाची व्याप्ती औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाच्या संदर्भावरून लक्षात येते. शिक्षणाची आवश्यकता काय ? तर समायोजन क्षमता, विविध समस्या, निराकरण, यशस्वी व आधुनिकता इ. या सर्वांसाठी शिक्षणाची आवश्यकता असते. शोषणविरहित लोकशाही अधिष्ठित सामाजिक समानतेचा नव समाज घडविणे हा शिक्षणाचा गर्भितार्थ आहे, हे समजण्यासाठी कॉलेजचे शिक्षण संपते न संपते तो विद्यार्थी समाजातील एक आदर्श कुटुंब प्रमुख म्हणून वावरत असतो. यावर प्राध्यापकांनी समाधान न मानता विकास कामाचा आराखडा तयार करून मुलांच्या कॉलेज जीवनात त्यांना समजावून सांगितला पाहिजे. समाज किंवा देश कसा असावा यासंबंधीचे विचार कॉलेज वातावरणातून शिकविले गेले पाहिजे. अलीकडे समाज शिक्षणामध्ये प्रामुख्याने नवीन प्रकारचे विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापर आपल्या शिक्षण क्षेत्रात केलेला आहे. म्हणून या दोन्ही पद्धतीचा वापर प्रकर्षाने होण्याची गरज प्राध्यापकांनी लक्षात ठेवली पाहिजे. अशा प्रकारचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना पचेल, पेलवेल असा निवडता आला पाहिजे. कारण कॉलेजचा विद्यार्थी आणि समाज यात कोणत्याही प्रकारचा फरक राहिलेला नाही. प्रापंचिक जीवन आणि विद्यार्थी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

२१ व्या शतकातील प्रवेश हा एकट्याचा नसून सर्व लहान-मोठ्या वयातील सर्वांचा एकत्रितपणे असून या स्पर्धेच्या युगात टिकविण्यासाठी प्रौढ निरक्षर आणि साक्षर अशा दोघांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्राध्यापकांनी समाजात समाविष्ट होऊन विविध प्रकारच्या अनेक समस्यातून (अडचणीतून) मार्ग काढून प्रबोधन करणे अगत्याचे आहे. शिवाय समाज आणि प्राध्यापक हे वेगवेगळे नसून प्राध्यापक हा प्रगल्भ विचाराचा, संशोधनात्मक अभ्यासाचे ज्ञान असणारा, समाजाच्या सर्वांगीण विकासाचे ज्ञानरूपी भांडार म्हणून ओळखले जाते.

शिक्षण देणारे शिक्षक, अंगणवाडी ते विद्यापीठात काम करणारे प्राध्यापक, प्रोफेसर किंवा कुलगुरुपर्यंत प्रामुख्याने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्याचे काम करीत असतात. (हायस्कूलपर्यंतचा) विद्यार्थी अनुकरण करीत असतो. प्राध्यापकाचे वागणे, बोलणे, आचरण करणे, आदर्श असेच समाजापुढे उभे केले पाहिजे. आदर्श कुटुंब, आदर्श देश, मानवाचा सर्वांगीण विकास, संस्कृती, देशाभिमान, एकीचे वातावरण, एकीचे महत्त्व इ. अशा अनेक विविध प्रकारे देशाचा विकास साध्य करण्याच्या साधनसामुग्रीचा योग्य वापर करणारा उच्च शिक्षक म्हणजे प्राध्यापक यापेक्षा दुसरा कोणी असूच शकत नाही. म्हणून प्राध्यापकांनी अभ्यासक्रमाशिवाय देश विकासाच्या साधनांचा उपयोग करून समाजाभिमुख शिक्षण देणारा असावा.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जीवनात अशा शिक्षणाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या विकसनशील, खंडप्राय देशात संकुचितपणामुळे ऐक्य भावनेचा अभ्यास दिसून येत

आहे. यामध्ये अलीकडे थोडीफार सुधारणा झाली आहे किंवा पूर्णत्वास येण्यास प्राध्यापकांनी शिक्षणाद्वारे ऐक्य साधण्याचे शिक्षणाद्वारे समाजात मिसळून प्रयत्न करणे अगत्याचे आहे.

अलिकडच्या काळात शिक्षणाचे जागतिकीकरण ही संकल्पना रूढ झाली आहे. त्यामुळे यापुढे जागतिक शिक्षण (Global Education) ही संकल्पना लक्षात घेऊनच उच्च शिक्षणाचे नियोजन आणि प्रशासन ठरवावे लागणार आहे. जागतिक शिक्षणाची उद्दिष्टे लक्षात घेता अनेक विविध प्रकारच्या कल्पना पुढे येत आहेत. त्या अमर्यादित स्वरूपाच्या आहेत. तरी पण 'जगातील विविध मानव समूहाच्या विविध संस्कृती मधील चांगल्या गोष्टीचं संवर्धन करणे तसेच जागतिक शांतता, सलोखा आणि जागतिक पर्यावरण यांची नव्या जाणिवांची निर्मिती करून जागतिक मानवाची संकल्पना साकार करणे जागतिक स्तरावरील ज्ञान, तंत्रज्ञान, साधन सामुग्री आणि मनुष्यबळ याचा एकत्रित उपयोग करुन विकासाची गती वाढविणे इ. अशा कठीण समस्यांवर अभ्यासपूर्वक, संशोधनात्मक फक्त उच्च शिक्षक प्राध्यापकच तोडगा काढू शकेल, असे प्रामुख्याने स्पष्ट म्हणावे लागेल. कारण अशा प्रकारचे अध्यापन फक्त प्राध्यापकच करू शकेल. तेव्हा प्राध्यापकने सावलीप्रमाणे जवळचे नाते समाजाशी जोडून समाज शिक्षणाचे तसेच समाज सुधारणेचे काम करावे असे वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळात उच्च शिक्षणाचा प्रसार खूपच झाला असे सर्वसाधारण मत झाले आहे. पण याची टक्केवारी पाहिली की, विकसित देशामध्ये संबंधित वयोगटातील ४०% ते ५०% प्रमाणात विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळतो. भारतात मात्र याचे प्रमाण ७% ते १५% याच्या आसपास वाढविण्याचा सध्या प्रयत्न चालू आहे. अशा प्रकारचे प्रमाण लक्षात घेता समाज किती २१ व्या शतकात प्रवेश करण्यास पात्रतेचा आहे, ती पात्रता वाढविणे गरजेचे आहे. हे प्रमाण ७०% ते ८०% पर्यंत वाढविले तर खऱ्या अर्थाने समाजात विकास झाला आहे, असे म्हणावे लागेल. म्हणून प्राध्यापकाने समाज सुधारण्यास कारणीभूत होणारा विद्यार्थी आणि समाज तयार करण्यासाठी समाजात समाविष्ट होऊन समाजाची बांधिलकी जोपासली पाहिजे.

• • •

# "Um|S> gßñH¥$Vr MoOVZ'
# hoM emídV n`m©odaU gßdY©Z 2012 Mo gßH$ën

*प्रा. कुंदन साबाशीव दुफारे*

महाराष्ट्राच्या अती पूर्वेकडील गडचिरोली जिल्हा आजही महाराष्ट्र राज्याचे जंगलाच्या बाबतीत प्रतिनिधीत्व करीत आहे. जिल्हा माहिती केंद्रातील माहिती नुसार ७८.०४ टक्के क्षेत्र वनाच्छादित आहे. तर डायरेक्टोरेट ऑफ इमॉनॉमिक्स ॲड स्टॅटिस्टिक्स, महाराष्ट्र शासन, मुंबईच्या शासन, मुंबईच्या अहवालाप्रमाणे ९०.४० टक्के वनक्षेत्र असले तरी वनाच्छादन मात्र ६०.३० टक्के एवढे आहे. राज्याच्या सरासरीपेक्षा अधिक जास्त आहे. याला कारणीभूत त्या जिल्ह्यात वास्तव्याला असणारी आदिवासी लोकांची रूढी परंपरेनुसार चालत असलेली गोंड संस्कृती.

विदर्भाचे वर्धा नदीच्या सीमेने वऱ्हाड व गोंडवन असे दोन भाग पडले गोंडवना मध्ये नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली हे जिल्हे येत असून गडचिरोली हा जंगलाचा, आदिवासी गोंडाचा जिल्हा म्हणून २६ ऑगस्ट १९८२ पासून ओळखला जातो. एकूण लोकसंख्येच्या ३३ टक्के लोक गोंड आदिवासी आहेत. हा जिल्हा उद्योग प्रदूषणरहित असल्यामुळे येथील आदिवासी जनता जंगलावर आधारीत वनउपज संग्रहन करून आपला उदरनिर्वाह करीत असतात. तरी पण महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक जंगल आहे. याचे कारण की वनउपज संग्रहन करताना आदिवासीची रूढी परंपरेनुसार ठरलेली एक पध्दत आहे. त्याला 'वनउपज पोलो' असे म्हणतात.

**वनउपज पोलो–**

गावातील लोकांनी कामाची सामूहिक सुट्टी घेऊन गावची ग्रामसभा घेणे आणि वनउपज संकलनाचे नियम ठरवणे, यालाच 'वनउपजपोलो' असे म्हणतात. आदिवासी लोक 'झाडा' ला कधीच दगड मारून वनउपज पाडत नाही तर कोणतेही वनउपज परीपक्व होऊन खाली पडत नाही, तोपर्यंत त्या वनउपजाचे उपभोग घेत नाही. उदा. मोहफूल हे आदिवासीचे मुख्य खाद्य आहे. मोहापोलो किंवा मोहाटोळ (मोहबिज) बाबत विचार केल्यास, मोहफूल किंवा मोहटोळ पडायला सुरवात झाल्यास लगेच मोहवेचून आणायचे नाही तर सुरूवातीचे ७ ते ८ दिवस सोडून मोहफूल, मोहटोळ वेचायला सुरवात करायची. अशा अलिखित नियमांचा ठराव होतो. नियम तोडणाऱ्यावर दंडात्मक कारवाही केली जाते.

या नियमामागे पर्यावरण संवर्धनाचे फार मोठे रहस्य दडलेले आहे. ते या प्रमाणे, मोहफूल पडायला लागते तेव्हा पासूनच लोक वेचायला सुरवात केली तर जंगलात असणाऱ्या वन्यप्राण्याना त्या मोह फुलांचा आस्वाद घेता येता येणार नाही. तात्पर्य त्या मोहफुलावर फक्त मानवाचाच अधिकार नसून मानवासोबत वन्यप्राण्याचा सुद्धा अधिकार आहे हे सिध्द होते. तसेच मोहटोळ सुरवातीपासून पूर्ण वेचून आणली तर जमीनीवर मोह बी राहनार नाही आणि नैसर्गिकरित्या नवीन मोहाचे रोपे तयार होणार नाही आणि जंगल नष्ट होण्याची प्रक्रिया सुरू होणार.

तात्पर्य गडचिरोलीतील जंगल संवर्धनाकरीता आदिवासी संस्कृतीतील पोलो पध्दतीचे मोठे योगदान आहे. परंतु आज जागतिकीकरणाची झळ लागल्यामुळे गैरआदिवासी लोक औद्योगिक विकासाच्या दृष्टीने कच्च्यामालाचे स्त्रोत म्हणून गडचिरोलीतील जंगलदहनाचे लक्ष वेधीत आहेत. उदा. तेंदूपत्ता कटाई हंगामात मोठ्या प्रमाणात वणवे लावले जातात. त्यामुळे बरीच जैवविविधता नष्ट होत चाललेली आहे. पेपर मील बांबू कटाई करताना बांबू कटाईचे नियम कधीच पाळत नाही तर जास्तीतजास्त बांबू कसा तोडता येईल याचाच प्रयत्न करीत असतो. महाराष्ट्र शासनाने सामाजिक वनीकरण विभागामार्फत दरवर्षी एकाच ठिकाणी वृक्षारोपणावर खर्च करण्यापेक्षा लोप पावत चाललेली गोंड संस्कृतीचे जतन केल्यास पर्यावरण संवर्धन होऊन शाश्वत पर्यावरणीय विकास साधता येईल.

□ □ □

*(पृष्ठ क्र. ४० वरुन)*

ते घरकुलही आनंदाने शहारले. आम्हाला नथुरामच्या बायकोने मोठ्या आस्थेने भांडी दाखवली तेव्हा तिच्या चेहऱ्यावरील समाधान हे आपला नवरा आता स्वावलंबी झाला याचा आनंद दर्शवणारे होते.

गोविंद गोपाळ नाईक या आदिवासीने स्वत:च्या मालकीची बैलगाडी जेव्हा आम्हाला दाखवली तेव्हा वेठबिगारी म्हणून आयुष्य घालविणाऱ्या आदिवासी परंपरेला त्यांनी सुरुंगच लावला होता. तो म्हणाला कधी दहा, कधी पंधरा, कधी पंचवीस रूपये मी कमाई करतो. स्वावलंबनाचे शिक्षण मिळाल्याचा हा साराच चमत्कार होता. त्यावेळचे कोकण विभागाचे आयुक्त यांनाही या वाडीला भेट दिली तेव्हा ते स्वत:ही भारवून गेले. आपल्या प्रतिक्रियेत त्यांनी म्हटले की, संपूर्ण महाराष्ट्रातील हा एक यशस्वी प्रयोग असून या धरतीवर अनेक योजना राबविता येतील, अशी माझी खात्री झाली आहे.

वाडीची मांडणी अत्यंत कलात्मकरित्या केली होती. सांदिपनी, व्यास, श्रीराम अशा पौराणिक नावांची झाडे येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करीत होती. घराची मांडणीही याच पध्दतीची होती. चंद्रकला, औदुंबर, पुष्पकुंज, राधेश्याम, युगल अशी ही घरकुलांची नावेही मन आकर्षित करुन घेत होती. सुरेश कांबळे, पी. व्ही. पाटील, मुकुंद पाटील या चित्रकारांच्या कुंचल्यांनीही वाडीची शान अधिक वाढविली होती. विशेषत: घरकुले स्वावलंबी होण्यासाठी या वाडीतील तरुणांना शिंपीकाम, सुतारकाम, गवंडीकाम, सायकल दुरुस्ती याचे व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांना समाजात मानाने जगण्यास प्रभाकर पाटील यांनी आधार दिला होता, हे येथे विसरुन चालणार नाही. आजही असे प्रयोग ठिकठिकाणी आदिवासीवाडीवर शासनाने वाढीस लावले तर अल्प मोबदल्यात इतरांकडून होणाऱ्या आदिवासींचा श्रमाचा लिलाव त्यामुळे थांबेल. परंतु हे सर्व कोण मनावर घेणार?

• • •

# वैदूंमार्फत चाललेली आदिवासींची आरोग्य व्यवस्था

गडचिरोली हा वनौषधींनी संपन्न जंगलाचा जिल्हा. याच जिल्ह्यातील कुरखेडा आणि कोरची या तालुक्यांमध्ये १९८० च्या दशकापासून डॉ. सतीश गोगुलवार व त्यांच्या पत्नी शुभदा देशमुख एक आगळावेगळा प्रयोग राबवत आहे. या औषधींच्या उपयोगांचे ज्ञान असलेले वैदू इथे मोठ्या प्रमाणावर होतेच. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग

प्राथमिक उपचारांसाठी करता आला तरी आदिवासींच्या आरोग्यविषयक अनेक समस्या सुटतील, हे डॉक्टरांनी जाणले. अर्थात त्यासाठी या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे, तिचे संवर्धन करणे आवश्यक होते. ''स्वत:चे प्रश्न स्वत:च सोडवू या,' अशी साद देत या दांपत्याने आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आदिवासींना या कामात सहभागी करुन घेतले. यातूनच १९९० मध्ये ''लोकस्वास्थ्य परंपरा संवर्धन संस्थेची सुरुवात झाली.

वैदूंच्या ज्ञानाचा प्रचार-प्रसार व्हावा यासाठी, तसेच त्यांच्या औषधे तयार करण्याच्या पद्धतींमध्ये सुधारणा-नेमकेपणा आणण्यासाठी वैदूंचे एक शिबिर भरवण्यात आले. गडचिरोली आणि शेजारच्या जिल्ह्यांमधून सुमारे ३० वैदू यात सहभागी झाले होते. या वैदूंशी संवाद साधण्यासाठी डॉक्टरांनी नागपूर व तमिळनाडू येथील आयुर्वेदिक तज्ज्ञांना आमंत्रित केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वैदूंच्या या पारंपरिक ज्ञानला प्रथमच शास्त्रीय मान्यता देण्यात आली.

वैदूंच्या ज्ञानाचा उपयोग आदिवासींना रोजच्या आयुष्यात व्हावा यासाठी डॉक्टरांनी, ''आम्ही आमच्या आरोग्यासाठीच्या कार्यकर्त्यांना वनौषधींची ओळख व त्यापासून औषधनिर्मिती'' याचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. त्याच्या पुढचा टप्पा होता, या प्रशिक्षित कार्यकर्त्यांनी स्थानिक व बाहेरच्या लोकांपर्यंत हे ज्ञान पोचवण्याचा. ही प्रक्रिया आजही सुरू आहे. (आता लोक स्वत:हून येतात व प्रसंगी शुल्क भरूनही या प्रशिक्षण कार्यक्रमांना उपस्थित राहतात.) गावपातळीवर वनौषधींच्या माहीतगार व्यक्ती असाव्यात यासाठी संस्थेमार्फत गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील १६९ आरोग्यसखींना याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. वनौषधींचे संवर्धन करण्यासाठी कुरखेडा येथील येरंडी गावातील प्रशिक्षण केंद्रात वनौषधी बाग उभारण्यात आली. ''लावा वनौषधी दारी, वाढवा आयुष्याची दोरी'' या संस्थेच्या घोषवाक्यानुसार इथून लोकांना वनौषधींची रोपे पुरवण्यात येतात. कोरची, चांदोना, रानवाही येथील १७ महिला बचतगटांतील महिला आता वनौषधी तयार करून त्यांचा उपयोगही करतात. गवती चहा, पाणओवा, अडुळसा, निरगुडी, तुळस, शतावरी, कोरफड, ब्राम्ही, आवळा, माका अशा नेहमी लागणाऱ्या दहा वनौषधींची रोपे इथे प्राधान्याने तयार केली जातात. अशा नऊ रोपवाटिका इथे सुरु आहेत.

***(सौजन्य : साप्ताहिक ईसकाळ)***

*(पृष्ठ क्र. ३४ वरुन)*

चळवळ अधिक बंडखोरीची केली त्यांना सर्व स्तरांतून पाठींबा मिळाला.

आज पाश्चिमात्यकरण, सांस्कृतिकीकरण, शिक्षणाचा प्रसार, आधुनिकीकरण, समान कायदे, न्यायव्यवस्था, कायदेशीर तरतुदी, समान संधी यामुळे दलितांच्या स्थितीत आमूलाग्र बदल होत आहे. तसेच जातीचे राजकारण, एकसंघपणाचा अभाव, स्वार्थी प्रवृत्ती यामुळे दलित साहित्य चळवळ आज थोडी मागे पडलेली दिसते.

समानतेचे हे चित्र म्हणजे 'ओॲसीस' आहे, म्हणजे फक्त बोलण्याचे कागदपत्री दिसते; पण प्रत्यक्षात मात्र जातीचे राजकारण, जातीय संघटन, सत्ता संघर्ष पहायला मिळतोच. यातून जातव्यवस्था, वर्गव्यवस्था, गरीब श्रीमंत भेद, असमानता आहे. आज समाजाची अवस्था ''दुरून डोंगर साजरे'' अशी आहे. त्यासाठी पुन्हा दलित लेखकांनी बदलत्या परिस्थितीचे, वास्तविक स्थितीचे लेखन करणे आवश्यक आहे. दलित साहित्य चळवळीने अधिक आक्रमक रूप धारण केले पाहिजे. शासनाने दलितांच्या बाजूने कितीही कायदे केले तरी अजूनही दलितांवरचे अत्याचाराचे प्रमाण कमी झालेले नाही. याच्याविरुद्ध आता लेखनातून याला वाचा फोडणे गरजेचे आहे. ही जाणीव लक्षात ठेवून ज्योती लांजेवार, सरला सारखखापे, रूपा कुलकर्णी, निलम गोऱ्हे, लक्ष्मण माने, हरी नरके, उत्तम कांबळे, केशव मेश्राम कार्य करीत असल्याचे दिसतात. पण समाजातील प्रत्येक वर्गाने दलित साहित्य चळवळीचे महत्त्व जाणून घेऊन दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी यात पुढाकार तसेच सहभाग घेतला तर ही चळवळ सक्षमपणे पुढे चालू राहू शकेल. नुकतेच जानेवारी २०१२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ''जाती निर्मूलन'' या ग्रंथास ७५ वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी त्यांनी जातीचे समूळ नष्ट करून प्रत्येक व्यक्तीला समानतेची वागणूक मिळावी असा संदेश या ग्रंथातून दिले होता. ती खरी दलित चळवळ होती. अशाच पध्दतीच्या लेखनाची आता समाजाला गरज आहे. तरच ही दलित साहित्य चळवळ समाजात रूढ होऊ शकेल.

**संदर्भ सूची :**


१) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. दत्ता भगत, डॉ. शरणकुमार लिंबाळे, ''ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य'', य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक - सप्टेंबर, २००१

२) डॉ. भालचंद्र फडके, ''दलित साहित्याची प्रकाशयात्रा''.

३) गंगाधर पानतावणे, ''दलितांचे प्रबोधन''

४) डॉच्य भालचंद्र फडके, ''दलित साहित्य वेदंना आणि विद्रोह''

५) बाबुराव बागुल, ''दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान''

६) यशवंत मनोहर, ''दलित साहित्य सिद्धांत व स्वरुप''


• • •